RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
अॅड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार, ०३ जून २०२६
Wednesday, 04 June 2026

वर्ष : ६ | अंक : १५३
Year : 6 | Issue : 153

दैनिक | किंमत : ₹ ५/-
Daily | Rate: Rs. 5/-

**दि. ०३ जून 2026**



१९२९- श्री. सुरेंद्रनाथ गोविंद टिपणीस यांचे अध्यक्षतेखाली महाड माणगाव तालुक्यातील अस्पृश्य लोकांची जाहीर सभा.

१९३५- मुंबई शेड्युल कास्ट फेडरेशन ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

## क्रिकेट कॅम्पमध्ये १५ वर्षांच्या मुलाचा रोलरखाली चिरडून मृत्यू



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. बार्शी येथे आयोजित एका उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिरामध्ये खेळपट्टी तयार करताना जड रोलरखाली चिरडून एका १५ वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ३० मे रोजी सकाळी ही घटना घडली. याप्रकरणी निष्काळजीपणाचा ठपका ठेवत पोलिसांनी दोन क्रिकेट प्रशिक्षक आणि संबंधित क्रिकेट असोसिएशनवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे क्रीडा जगतात आणि पालकांमध्ये प्रचंड संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे. ३० मे रोजी सकाळी सरावाचे सत्र सुरू होण्यापूर्वी खेळपट्टी तयार करण्याचे काम सुरू होते. नेहमीप्रमाणे मैदानावर खेळपट्टी सपाट करण्यासाठी जड रोलर फिरवला जात होता. प्रशिक्षकांच्या सांगण्यावरून हा मुलगा इतर मुलांसोबत मिळून तो अवजड रोलर ओढत होता. मात्र, अचानक तोल गेल्याने आरव त्या जड रोलरच्या खाली आला. रोलरचे वजन जास्त असल्याने तो गंभीररीत्या चिरडला गेला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, लहान मुलांकडून एवढे मोठे आणि जोखमीचे काम करून घेतले जात असताना घटनास्थळी एकही प्रौढ व्यक्ती किंवा पर्यवेक्षक उपस्थित नव्हता. "मुले कोणत्याही सुरक्षेविना आणि मार्गदर्शनाशिवाय तो जड रोलर ओढत होती. इतक्या लहान मुलांकडून असं धोकादायक काम करून घेताना तिथे सुरक्षेची कोणतीही काळजी घेतली गेली नव्हती," अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने दिली.





# CBSE पुनर्मूल्यांकन पोर्टलवर सायबर हल्ला

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) इयत्ता १२वीच्या पुनर्मूल्यांकन पोर्टलवर मंगळवारी प्रचंड रहदारीच्या काळात सायबर हल्ल्याचा प्रयत्न झाला. मंडळाच्या म्हणण्यानुसार, काही दुर्भावनापूर्ण घटकांनी पोर्टलच्या सेवांमध्ये व्यत्यय आणण्याच्या उद्देशाने वारंवार सायबर हल्ले केले, परंतु सुरक्षा उपाय आणि तांत्रिक देखरेखीमुळे पोर्टलचे कामकाज सामान्यपणे सुरू राहिले. या कालावधीत हजारो विद्यार्थ्यांनी त्यांचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज यशस्वीपणे सादर केले.

सीबीएसईने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, पुनर्मूल्यांकन पोर्टलमध्ये सध्या एका वेळी ८,००० हून अधिक प्रत्यक्ष वापरकर्त्यांना हाताळण्याची क्षमता आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत, १६,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज यशस्वीपणे सादर केले होते. मंडळाने सांगितले की, प्रचंड रहदारी असूनही, पोर्टल कार्यरत राहिले आणि विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे सुरू ठेवले.

> सीबीएसईच्या म्हणण्यानुसार, पोर्टलवर नुकताच एक डिनायल-ऑफ-सर्व्हिस (DoS) हल्ला करण्याचा प्रयत्न झाला, ज्यामध्ये केवळ दोन मिनिटांत अंदाजे १५ लाख हिट्सची नोंद झाली. तांत्रिक तज्ञांच्या मते, अशा हल्ल्यांचा उद्देश सर्व्हरवर अतिरिक्त दबाव टाकून सेवांमध्ये व्यत्यय आणणे हा असतो.

मंडळाने सांगितले की, सायबर हल्ल्याचे प्रयत्न होऊनही, पोर्टलवर देखरेख करणाऱ्या तांत्रिक पथकांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आणि कोणताही मोठा व्यत्यय टाळला. सीबीएसईने असेही सांगितले की, विद्यार्थ्यांची माहिती आणि अर्ज प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित राहावी यासाठी सुरक्षा उपाययोजना सातत्याने अधिक मजबूत केल्या जात आहेत. मंडळाच्या मते, सायबर हल्ल्याव्यतिरिक्त, पोर्टलवरील अनधिकृत फाईल्समध्ये प्रवेश करण्याचे १,००,००० पेक्षा जास्त प्रयत्न झाले. तथापि, सुरक्षा प्रणालींनी हे प्रयत्न हाणून पाडले. सीबीएसईने स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांच्या डेटाची सुरक्षा हे त्यांचे सर्वोच्च प्राधान्य आहे आणि कोणत्याही संशयास्पद हालचालींवर सतत लक्ष ठेवले जात आहे. पोर्टलची कार्यक्षमता आणि सुरक्षा दोन्ही सुनिश्चित करण्यासाठी तांत्रिक पथके चोवीस तास तैनात करण्यात आली आहेत. सीबीएसईने सांगितले की, विद्यार्थी आणि पालकांकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे, पोर्टलमध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामध्ये सत्राची अंतिम मुदत वाढवण्याचा समावेश आहे, जेणेकरून विद्यार्थी कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा घाईशिवाय अर्ज प्रक्रिया पूर्ण करू शकतील. मंडळाने म्हटले आहे की, वापरकर्त्यांचा अनुभव सुधारण्यासाठी आणि अर्ज प्रक्रिया अधिक सोपी व सोयीस्कर करण्यासाठी तांत्रिक सुधारणा सातत्याने केल्या जात आहेत. यामुळे अधिक विद्यार्थ्यांना पोर्टल वापरणे सोपे होईल.

## महत्वाच्या बातम्या

### कोटाने तिसऱ्यांदा टॉप १० मध्ये आपले वर्चस्व कायम

**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी जेईई-अॅडव्हान्स्ड २०२६ च्या गुणवंतांची भेट घेतल्यानंतर सांगितले, 'ज्यांनी परीक्षेत कठोर परिश्रम आणि समर्पण दाखवले, त्यांचे मी अभिनंदन करतो. आज भारत तांत्रिक प्रगती करत आहे आणि आमचे विद्यार्थी तंत्रज्ञान आणि नवोपक्रम या दोन्ही क्षेत्रांत विविध जागतिक आणि भारतीय आव्हानांवर उपाय शोधत आहेत. कोटा येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निःसंशयपणे एक सकारात्मक वातावरण मिळते आणि चांगल्या वातावरणासोबतच त्यांना चांगले शिक्षणही मिळते. त्यांना एक नवीन आध्यात्मिक दिशाही मिळते.' इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, रुरकीने देशातील प्रतिष्ठित अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा, संयुक्त प्रवेश परीक्षा (अॅडव्हान्स्ड) २०२६ चा निकाल जाहीर केला आहे. कोटाने यावर्षीच्या परीक्षेच्या निकालात पुन्हा एकदा वर्चस्व गाजवले असून, देशभरातील अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी एक अग्रगण्य केंद्र म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. जाहीर झालेल्या निकालानुसार, कोटाचा विद्यार्थी शुभम कुमार याने अखिल भारतीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याचा मित्र कबीर याने दुसरा क्रमांक मिळवून कोटाच्या यशात आणखी एका महत्त्वपूर्ण कामगिरीची भर घातली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे केवळ त्यांचे कुटुंबीय आणि शिक्षकच नव्हे, तर संपूर्ण कोटा शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पुण्यातील २०८ गावे, ७७६ वाड्या पाण्यासाठी हवालदिल

**पुणे :** पुणे विभागात दिवसेंदिवस वाढत्या उन्हाळ्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असून सुमारे सव्वा तीन लाख नागरिकांना २०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये २०८ गावे आणि ७७६ वाड्या वस्त्यांचा समावेश असून सर्वाधिक पाणी टंचाई आणि टँकर पुणे जिल्ह्यातच असल्याची माहिती पुणे विभागीय आयुक्तालयाकडून देण्यात आली. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १०४ टँकर कार्यरत आहेत. या टँकरद्वारे ९९ गावे आणि ४२६ वाड्यांतील १ लाख ७३ हजार ५२९ नागरिक व २० हजार ३०३ पशुधनाला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. विभागात पुण्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यात मार्च महिन्यापासून तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअस पेक्षा कमी राहिलेला नाही. वाढत्या उन्हाच्या झळा, बेसुमार पाण्याचा वापर, बाष्पीभवन आणि झपाट्याने खालावणारी पाणी पातळी यामुळे धरणे कोरडे पडण्याच्या मार्गावर आहे. जिल्हा परिषदांकडून गाव, वाड्या वस्त्यांवर पेय जल योजनेची पुरेपूर अंमलबजावणी झाली नसल्याने अद्यापही या वाड्या वस्त्यांवर दरवर्षी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

### महाराष्ट्रातल्या आदिवासी महिलांचे जगणे असह्य करणारी परिस्थिती!

**मुंबई :** महाराष्ट्रातल्या नंदुरबार जिल्ह्यात वडवी पाडा नावाचं गाव आहे. या गावातल्या महिला रोज पाण्याच्या शोधात दुपारच्या रणरणत्या उन्हात निघतात, एका डोंगराळ भागातून रिकामे हंडे, बादल्या घेऊन उतरतात. पाणी भरुन झाले की पुन्हा हीच डोंगराळ वाट भरलेले हंडे, बादल्या, भांडी डोक्यावर घेऊन वाहतात. या महिलांचे पाणी आणण्याचं सर्वात जवळचं ठिकाण हे तीन किलोमीटर अंतरावर आहे. त्यापुढेही त्यांना जावे लागते. कडक उन्हात पायपीट केल्यानंतर त्यांना डोक्यावरून वाहून हे पाणी आणावे लागते. ज्या डोंगराळ भागात या आदिवासी महिला राहतात तिथे एक छोटा खड्डा आहे. त्यात पाणी येते पण जेमतेम चार पाच भांडी भरली की ते पाणी संपते. त्यानंतर पुन्हा पाणी येण्यासाठी एक तास तरी वाट बघावी लागते. सातपुडा पर्वत रांगांमध्ये राहणाऱ्या या आदिवासी महिलांचे अर्ध आयुष्य दूरवर असलेल्या विहीरी, तलाव किंवा नदी इथून पाणी भरण्यात आणि डोंगराळ वाट तुडवत घरी येण्यात संपले आहे.

## मुस्लिमांवर गाईला आई मानण्याचे बंधन नाही': हुसेन दलवाई

**मुंबई :** गाईला 'राष्ट्रीय प्राणी' दर्जा देण्यावरून चर्चा सुरू आहे. दरम्यान, काँग्रेस नेते हुसेन दलवाई यांनी मंगळवारी सांगितले की, काही लोक गाईला आई मानत असतील, पण ही श्रद्धा स्वीकारणे मुस्लिमांवर बंधनकारक नाही.

दलवाई म्हणाले, *'पूर्वी गाईला राष्ट्रीय प्राणी म्हटले जायचे आणि आता तिला 'आई' म्हटले जात आहे. मुसलमान थोडे जरी मागे हटले, तरी त्यांना आणखी मागे ढकलण्याचे प्रयत्न केले जातात. तुम्ही गाईला 'आई' म्हणू शकता. पण आम्ही तिला एक महत्त्वाचा प्राणी आणि देशाचा राष्ट्रीय प्राणी मानतो. त्यात काय चुकीचे आहे? ज्यांनी तिला राष्ट्रीय प्राणी म्हटले ते बरोबर होते.'*



तो पुढे म्हणाला, ***'तुम्ही गाईला तुमची आई मानू शकता. पण मुस्लिम हे स्वीकारणार नाहीत. प्रत्येकाने यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे का? आपण भारताला 'भारत माता' म्हणतो. पण जेव्हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी इस्त्रायलच्या दौऱ्यावर गेले होते, तेव्हा त्यांनी इस्त्रायलला आपला 'मातृदेश' म्हटले, असा आरोप आहे. अशी विधाने अनाकलनीय आहेत.'***

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ काय म्हणाले? नुकतेच, उत्तर प्रदेशातील बिजनौर येथे एका सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, 'गाय ही आपली आई आहे. तिच्याशी आपले नाते अगदी आपल्या आईशी असलेल्या नात्यासारखेच आहे. या नात्याला कोणत्याही पुराव्याची गरज नाही, आणि त्याला कोणत्याही नावाची किंवा दर्जाची आवश्यकता नाही.' बकरीदच्या काळात काही इस्लामी धर्मगुरूंनी गायीला राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित करण्याची मागणी केली असतानाच मुख्यमंत्र्यांचे हे वक्तव्य आले आहे. त्यांच्या मते, यामुळे पशुहत्या कमी होईल आणि या दुभत्या प्राण्याचे पावित्र्य वाढेल.

## सीबीएसई प्रकरणी ओएसएम सेवांच्या खरेदीची चौकशी करण्यासाठी समिती

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) नवीन ऑन-स्क्रीन मार्किंग (ओएसएम) प्रणालीवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने तातडीने कारवाई करत मंगळवारी मंडळाच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. एका अधिकृत अधिसूचनेनुसार, सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, ओएसएम सुविधेच्या खरेदीची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. पहा विद्यार्थ्यांची माहिती उघड झाल्याच्या नव्या आरोपांमुळे सीबीएसईवरील संकट अधिकच गडद झाले आहे. क्षमता विकास आयोगाच्या (CBC) अध्यक्षा एस. राधा चौहान यांची चौकशी समितीवर एकमेव सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, गरज भासल्यास त्या इतर अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकतात. 'अध्यक्षांना आवश्यकतेनुसार इतर कार्यालयांतील अधिकाऱ्यांची मदत घेण्याचे अधिकार आहेत. सीबीसीतर्फे समितीला सचिवालयीन साहाय्य पुरवले जाईल,' असे अधिसूचनेत म्हटले आहे. 'समिती एका महिन्याच्या आत कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला आपला अहवाल सादर करेल,' असे त्यात नमूद केले आहे.



सरकारने हे पाऊल अशा दिवशी उचलले, ज्या दिवशी सीबीएसईने इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी आपले पुनर्तपासणी पोर्टल सुरू केले होते. मात्र, काही तासांनंतर, मंडळाने या प्लॅटफॉर्मला लक्ष्य करणाऱ्या अनेक "सायबर धमक्या' मिळाल्याचे कळवले.

## कॉक्रोच जनता पार्टीत खूप मोठा चेहरा प्रवेश करणार?





**मुंबई :** देशाच्या राजकारणात नवे वादळ उभे करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीत दुसरी फळी तयार निर्माण झाली असून पुढील १-२ दिवसांत त्याचा खुलासा होईल असे सांगत लवकरच खूप मोठा चेहरा पक्षात प्रवेश करणार असल्याची मोठी घोषणा संस्थापक अभिजीत दीपके याने केली आहे. येत्या ६ तारखेला अभिजीत दीपके भारतात येणार असून जंतर मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टी आंदोलन करणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. त्यात त्याने अनेक गोष्टींचा पहिल्यांदाच खुलासा केला. अभिजीत दीपके म्हणाला की, कॉक्रोच जनता पार्टीत खूप मोठा पक्षप्रवेश होणार असून ६ तारखेच्या आंदोलनातही हा चेहरा पाहायला मिळेल. हा राजकारणातला नाही परंतु शिक्षण क्षेत्रातला चेहरा आहे. राजकारणाला आपण केवळ निवडणुकीच्या दृष्टीने बघणे थांबवले पाहिजे. मतदार आणि नागरीक म्हणून आपल्याला राजकारण फक्त ५ वर्षातून एकदा मतदानापुरते मर्यादित आहे असे बघणे थांबवले पाहिजे. आमच्या वेबसाईटवर १० लाखाहून अधिक लोकांनी रजिस्टर केले आहे. आम्ही त्यांच्याशी संपर्क साधतोय. या लोकांनी जंतर मंतरवर यावे, शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा मागावा असं आम्ही सांगतोय. आम्ही व्हॉलंन्टियर फॉर्मही जारी केला होता. त्यात ३ तासांतच ४० हजाराहून अधिक लोकांनी ते स्वयंसेवक म्हणून काम करण्यास तयार आहेत असं सांगितले. आम्ही जे काही करणार ते शांततेत आणि संविधानाच्या चौकटीतच राहून करू हे सांगितले आहे.

## राष्ट्रीय कबड्डीपटू अनुष्का पाल हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक

### ३,६०० रुपयांची उधारी आणि राष्ट्रीय स्तरावरील कबड्डीपटू तरुणीचा खून

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्तरावर कबड्डीपटू म्हणून नाव कमावलेल्या १७ वर्षीय अनुष्का पालची हत्या झाल्याची माहिती नुकतीच समोर आली. उत्तर प्रदेशमधील मेरठची रहिवासी असलेली अनुष्का सहा आठवड्यांपासून बेपत्ता होती. तिचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत नाल्यात आढळल्यानंतर तिच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रेता असलेल्या आरोपीने केवळ ३,६०० रुपयांच्या उधारीसाठी अनुष्काचा निर्घृण खून केला. मेरठ जिल्ह्यातील चिरोडी गावची रहिवासी अनुष्का १६ एप्रिल पासून बेपत्ता होती. ती एका खासगी शाळेत इयत्ता बारावीच्या वर्गात शिकत होती. गावात शिक्षण आणि कबड्डी प्रशिक्षणाच्या सुविधा नसल्यामुळे अनुष्काच्या कुटुंबाने तिला मेरठ शहरातील शोभापूर येथे शिक्षणासाठी पाठवले होते. येथेच एका भाड्याच्या घरात ती आणि तिचा लहान भाऊ अनमोल पाल राहत होते.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिच्या घराजवळ श्याम धनक नावाच्या व्यक्तीचे खाद्यपदार्थांचे दुकान होते. अनुष्का नियमित त्याच्या दुकानावर जात असल्यामुळे त्यांच्यात ओळख झाली होती. श्याम धनककडून तिने ३,६०० रुपये घेतले होते. अनुष्काच्या भावाने दिलेल्या माहितीनुसार, अग्निवीर योजनेचा अर्ज भरण्यासाठी अनुष्काने धनककडून उसने पैसे घेतले होते. मात्र पैसे वेळेत परत न दिल्यामुळे श्याम धनक संतापला होता. त्यातच अनुष्काने त्याच्या विरोधात तक्रार दाखल करण्याची धमकी दिल्यामुळे धनकने तिच्या डोक्यात विट मारली. ज्यात तिचा मृत्यू झाला. यानंतर धनकने तिचा मृतदेह गोणीत भरून तो जवळच्या नाल्यात फेकला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# ३६,५८५ कोटींची कर्जमाफी

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत ऐतिहासिक कर्जमाफीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. सरकारने शेतकऱ्यांसाठी ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमाफी केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना असे या कर्जमाफीला नाव देण्यात आले असून यातून ५६ लाखाहून अधिक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. राज्य मंत्रिमंडळात मान्यता मिळाल्यानंतरही सरकारकडून इतक्या मोठ्या निर्णयाची अधिकृतपणे घोषणा का करण्यात आली नाही असा प्रश्न अनेकांना पडला आहे. परंतु यामागे राज्यातील विधान परिषदेच्या निवडणुकीमुळे लागलेली आचारसंहिता हे कारण आहे. परंतु दुसरीकडे सरकारचा हा तर्क शेतकरी नेत्यांनी खोटा असल्याचे सांगितले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि किसान सभेचे डॉ. अजित नवले यांनी यावर आक्षेप घेतला. अजित नवले म्हणाले की, कर्जमाफीची घोषणा आधीच झाली होती त्यामुळे आचारसंहितेचे कारण देऊन माहिती देण्यापासून सरकार दूर जातंय का अशी शंका यातून उपस्थित होते. कर्जमाफी कुणाला करण्यात आली, याबाबत काय अटी आहेत, किती लाखांची कर्जमाफी झाली. २ लाखाहून अधिक कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांचे वन टाईम सेटलमेंट लागू होणार की नाही असे विविध प्रश्न उपस्थित होत आहे. ३०

## ५६ लाख शेतकऱ्यांना फायदा



### शेतकरी कर्जमाफी योजनेला मंत्रिमंडळाची मान्यता

**२ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीवर शिक्कामोर्तब तर निवडणूक आयोग आणि आचारसंहितेचे बहाणा कपोलकल्पित आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीतील मतदार थेटपणे या कर्जमाफीचे लाभार्थी नाहीत. सरकार बँक आणि प्रशासकीय स्तरावरील आपली ढिसाळ तयारी लपवण्यासाठी आचारसंहितेचा आधार घेत आहे. कर्जमाफीची घोषणा बजेटमध्ये यापूर्वीच झाली होती त्यामुळे आचारसंहितेचे तांत्रिक कारण असू शकत नाही असं सांगत राजू शेट्टी यांनी सरकारवर निशाणा साधला.**

जून २०२६ च्या आत प्रत्यक्षपणे कर्जमाफीचे हफ्ते बँकांमध्ये जमा झाले नाहीत तर शेतकऱ्यांना नव्याने कर्ज देणे अवघड होणार आहे. त्यामुळे खूप कमी काळ शिल्लक आहे. त्या परिस्थितीत माहिती दडवणे, अपारदर्शकता ठेवणे हे वाईट ठरू शकते. त्यामुळे सरकारने या कर्जमाफीची माहिती खुली करावी अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.

### महाराष्ट्र शेतकरी कर्जमाफीबद्दल ५ महत्त्वाचे मुद्दे

ऐतिहासिक कर्जमाफी पॅकेज - महाराष्ट्र मंत्रिमंडळाने एकूण ३६,९८५ कोटींच्या मोठ्या आर्थिक पॅकेजला मंजुरी दिली.

लाखो शेतकरी कुटुंबांना लाभ - या निर्णयामुळे राज्यातील ५६ लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांवरील भार कमी होणार

२ लाखांपर्यंतचे कर्ज माफ - या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे २ लाखांपर्यंतचे कृषी कर्ज पूर्णपणे माफ केले जाईल

नियमितपणे हफ्ते भरणाऱ्यांना प्रोत्साहन: जे शेतकरी नियमितपणे आपल्या पीक कर्जाची परतफेड करतील, त्यांना सरकारकडून ५०,००० चे प्रोत्साहनपर अनुदानही मिळेल.

आचारसंहितेमुळे घोषणा नाही - विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता तांत्रिक कारणांमुळे लागू असल्याने मुख्यमंत्री अधिकृत सार्वजनिक घोषणा करू शकले नाहीत असं सांगण्यात येते

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
♦ IDEAL FOR ♦
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus
• Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown
• Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

# संपादकीय

## प्रश्न विचारणे गुन्हा आहे का?

भारतीय लोकशाहीची सर्वात मोठी ताकद म्हणजे नागरिकांना मिळालेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य. संविधानाच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, सरकारच्या धोरणांवर टीका करण्याचा आणि सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याचा अधिकार दिला आहे. परंतु अलीकडील काळात काही घटनांकडे पाहिले असता हा मूलभूत अधिकार धोक्यात येत असल्याची भावना समाजात निर्माण होत आहे. विशेषतः नीट (NEET) परीक्षेतील पेपरलीक प्रकरण आणि त्यासंदर्भात विरोधी पक्षांच्या नेत्यांवर किंवा कार्यकर्त्यांवर होत असलेल्या कारवायांमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नीट परीक्षा ही देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेली अत्यंत महत्त्वाची परीक्षा आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा जीवनातील एक निर्णायक टप्पा असतो. अशा परीक्षेचा पेपर लीक होणे ही केवळ प्रशासकीय चूक नसून लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासघाताची घटना आहे. विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे केलेला अभ्यास, त्यांचे कुटुंबीयांनी घेतलेले कष्ट आणि आर्थिक त्याग एका क्षणात व्यर्थ ठरण्याचा धोका निर्माण होतो. पेपरलीक प्रकरण समोर आल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांनी मानसिक तणाव अनुभवला, काहींनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊलही उचलल्याच्या बातम्या समोर आल्या. या पार्श्वभूमीवर प्रश्न उपस्थित होतो की, पेपर लीक करणाऱ्यांवर आणि या व्यवस्थेतील दोषींवर कितपत कठोर कारवाई झाली? जनतेसमोर त्याचे समाधानकारक उत्तर आजही दिसून येत नाही. दुसरीकडे, या प्रकरणावर चर्चा करणाऱ्या विरोधी पक्षांच्या नेत्यांना किंवा कार्यकर्त्यांना पोलिसांकडून रोखले जात असल्याच्या घटना समोर आल्यास लोकशाहीबद्दल चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. एखाद्या सार्वजनिक प्रश्नावर बंद खोलीत चर्चा करणे, बैठका घेणे किंवा सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करणे हा लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. जर अशा चर्चांनाच आळा घालण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवरच आघात ठरू शकतो. लोकशाहीमध्ये सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलटपक्षी, सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरणे हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे. आज ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांनीही अनेक दशके विरोधी पक्षात राहून तत्कालीन सरकारांवर कठोर टीका केली होती. आंदोलने, मोर्चे, सभा आणि सार्वजनिक चर्चा यांच्याद्वारे त्यांनी आपली मते मांडली. त्या काळात जर त्यांच्या आवाजावर अशाच प्रकारे निर्बंध घालण्यात आले असते, तर कदाचित त्यांनाही लोकशाहीची किंमत अधिक चांगल्या प्रकारे समजली असती. सत्तेचे स्वरूप तात्पुरते असते, परंतु लोकशाहीची मूल्ये कायमस्वरूपी असतात. कोणतेही सरकार कायमचे नसते. काल विरोधात असलेले आज सत्तेत आहेत आणि आज विरोधात असलेले उद्या सत्तेत येऊ शकतात. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांशी वागणूक देताना संयम, सहिष्णुता आणि लोकशाहीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. कारण आज निर्माण केलेले निकष उद्या स्वतःवरही लागू होऊ शकतात. भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारांचे रक्षण करणे ही केवळ न्यायालयांची किंवा विरोधी पक्षांची जबाबदारी नाही. ती प्रत्येक नागरिकाची आणि सत्ताधाऱ्यांचीही तितकीच जबाबदारी आहे. सरकारवर टीका करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला गुन्हेगार समजण्याची प्रवृत्ती लोकशाहीला कमकुवत करते. लोकशाहीमध्ये विरोधी मतांना स्थान असते, संवादाला महत्त्व असते आणि प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. नीट पेपरलीकसारख्या गंभीर विषयांवर चर्चा होणे आवश्यक आहे. कारण अशा चर्चांमधूनच व्यवस्थेतील त्रुटी समोर येतात आणि सुधारणा घडतात. चर्चा दडपण्यापेक्षा समस्येचे मूळ शोधून दोषींवर कठोर कारवाई करणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना शिक्षा मिळाली पाहिजे, परीक्षाप्रक्रिया अधिक पारदर्शक झाली पाहिजे आणि अशा घटना पुन्हा घडणार नाहीत याची खात्री निर्माण झाली पाहिजे. लोकशाहीची खरी परीक्षा सत्तेत असताना होते. विरोधकांचे म्हणणे ऐकून घेणे, टीका सहन करणे आणि जनतेच्या प्रश्नांना उत्तर देणे ही परिपक्व लोकशाहीची लक्षणे आहेत. अन्यथा लोकशाहीचे रूपांतर हळूहळू भीतीच्या वातावरणात होण्याचा धोका असतो. आज आवश्यकता आहे ती संवादाची, पारदर्शकतेची आणि उत्तरदायित्वाची. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर राजकारण न करता त्यांचे हित सर्वोच्च मानले गेले पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण आणि लोकशाही मूल्यांचे जतन हेच भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे. कारण इतिहास सांगतो की कोणतीही हुकूमशाही कायम टिकत नाही, परंतु लोकशाही मूल्यांसाठी लढणाऱ्या जनतेचा आवाज कायम जिवंत राहतो.●●

## आयपीएलचा झगमगाटी उधळपाडा आणि प्रधानमंत्र्याचे जनतेला भावनिक आवाहन

आज जगाच्या नकाशावर युद्धाचा वणवा पेटला आहे. रक्ताने माखलेली युद्धभूमी आणि क्षेपणास्त्रांच्या धुराने काळवंडलेले आकाश दिसते आहे. रशिया-युक्रेन असो वा आखाती देशांतील संघर्ष, या युद्धांच्या ठिणग्या आता थेट आपल्या देशातील सामान्य माणसाच्या गरिबीच्या झोपडीपर्यंत पोहोचल्या आहेत. जागतिक बाजारातील अस्थिरतेचे कारण पुढे करून पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडरच्या किमतींनी सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे वाहतूक महागली आणि त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या ताटावर झाला आहे. भाजीपाल्यापासून ते धान्यापर्यंत सर्वच वस्तूंचे भाव कडाडले आहेत. ज्या घरांमध्ये गॅस सिलेंडरच्या किमतीमुळे पुन्हा चुली पेटू लागल्या आहेत, तिथे 'अच्छे दिन'च्या स्वप्नांची राख होताना दिसत आहे. हातावर पोट असलेल्या मजुराला आज गाडीत पेट्रोल टाकायचे की मुलाच्या शाळेची फी भरायची, अशा दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, जेव्हा देश महागाईच्या आगीत होरपळतोय, तेव्हा एकीकडे 'आयपीएल'च्या नावाखाली एका रात्रीत होणारी उधळण आणि तिकडे गॅसअभावी रिकामी असलेली शेगडी, हे चित्र एका प्रगत समाजासाठी भूषणावह नाही. एकीकडे आयपीएल च्या नावाने करोडो रुपयांचा आणि रोषणाईचा अश्लील उधळपाडा कालच संपला आहे. अलीकडेच आयपीएल स्पर्धेची सांगता झाली. या स्पर्धेत कोट्यवधी रुपयांची बक्षिसे, जाहिराती, प्रायोजकत्व, मनोरंजन आणि रोषणाई यावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला. एका बाजूला क्रिकेटपटूंवर पैशांचा वर्षाव होत असताना मात्र दुसरीकडे वास्तव अधिक गंभीर आहे. देशात अजूनही लाखो युवक रोजगाराच्या शोधात आहेत. महागाईमुळे सर्वसामान्यांचे कौटुंबिक अर्थकारण कोलमडत आहे. शेतकरी, कामगार, लघुउद्योजक आणि मध्यमवर्गीय नागरिक अनेक आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत एका खेळाडूला किंवा संघाला मिळणारी

## सामान्य माणसाच्या जखमेवर मीठ कोण चोळतंय ?



कोट्यवधींची बक्षिसे आणि दुसरीकडे बेरोजगार युवकाची संघर्षमय परिस्थिती यातील तफावत समाजाला अस्वस्थ करते. देशातील सामान्य नागरिक महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांच्या समस्यांशी संघर्ष करताना दिसतो. त्यामुळे अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, देशाच्या विकासासाठी आणि जनकल्याणासाठी आवश्यक असलेला पैसा मनोरंजन उद्योगात एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना देशाच्या प्रधानमंत्र्याचे आव्हान हा विरोधाभास केवळ आर्थिक नाही, तर तो आपल्या सामाजिक संवेदनशीलतेचा पराभव नाही का? सद्यस्थितीत सामान्य माणसाच जगण्याचं गणित विस्कटलेल दिसते आहे. आज मध्यमवर्गीय आणि कष्टकरी कुटुंबातील गृहिणीकडे जाऊन बघा; गॅस सिलेंडरचे दर एक हजार पार गेल्यामुळे पुन्हा एकदा चुलीचा धूर तिच्या फुफ्फुसांना छळू लागला आहे. 'उज्ज्वला' योजनेची स्वप्ने महागाईच्या धुराड्यात विरून गेली आहेत. पेट्रोल-डिझेल महागल्यामुळे शेतमालाची वाहतूक परवडेनाशी झाली आहे, परिणामी शेतकरी आणि ग्राहक दोघेही रडकुंडीला आले आहेत. ज्या हातांना काम हवे होते, त्यांच्या हातात आज केवळ रिकामे रेशन कार्ड आणि भविष्याची चिंता उरली आहे. “आत्मनिर्भर भारत”ची स्वप्नं दाखवली, “मेक इन इंडिया” च्या घोषणा दिल्या; पण जरा जागतिक तणाव वाढला की देशाची अर्थव्यवस्था डळमळू लागते, सप्लाय चेन विस्कळीत होते आणि सरकार जनतेला मानसिकदृष्ट्या तयार व्हायला सांगते, ही आत्मनिर्भरता आहे की आत्मसमर्पण?

सामाजिक विसंगतीचा कळस म्हणजे एकीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईमुळे सामान्य माणूस 'अस्तित्वाच्या लढाईत' गुंतला आहे, तर दुसरीकडे आयपीएलच्या मैदानावर खेळाडूंच्या षटकार व चौकाराच्या आतिषबाजीत अब्जावधींची उलाढाल होत असते. जेव्हा एखादा बेरोजगार तरुण रिकाम्या पोटी स्टेडियमबाहेरून जातो, तेव्हा त्या झगमगाटात त्याला स्वतःचे भविष्य अंधारात असल्याचे जाणवते. क्रिकेट हा खेळ मानला जातो, पण सध्याच्या परिस्थितीत तो केवळ 'व्यापार' बनला आहे. देशात जेव्हा गरिबी, बेरोजगारी आणि महागाईचा भस्मासुर थैमान घालत असतो, तेव्हा अशा उत्सवी प्रदर्शनांमुळे समाजात एक प्रकारची मानसिक दरी निर्माण होत आहे. अनेक वर्षे प्रशासनात काम केल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, नियोजनाचा अभाव आणि संवेदनशीलतेची कमतरता हीच मोठी समस्या आहे. जागतिक युद्धाचे कारण देऊन सामान्यांच्या खिशाला कात्री लावली जाते, पण त्याच काळात प्रधानमंत्र्याच्याच स्टेडियम वरच या महाकाय क्रिकेट उद्योगावर कोणताही 'विशेष कर' लावून जनतेला दिलासा का दिला जात नाही? लोकांच्या डोळ्यात अश्रू असताना मैदानावरील फटाक्यांची आतषबाजी ही त्यांच्या गरिबीची क्रूर थट्टा नाही का?आपल्याला मैदानातील चौकार-षटकारांच्या विक्रमांची गरज आहे की, देशातील प्रत्येक घरात दोन वेळची भाकरी सुरक्षित असण्याची? ज्या देशात आजही लाखो मुले कुपोषित आहेत आणि हजारो तरुण रोजगारासाठी भटकत आहेत, तिथे क्रिकेटच्या खेळाला 'युद्धसदृश' महत्त्व देणे कितपत योग्य आहे? मनोरंजनाचा हा पडदा इतका जाड झाला आहे की, त्यामागे दडलेले गरिबांचे हुंदके कोणालाच ऐकू येत नाहीत का? याचा शोध घेतला पाहिजे. खेळ हा विरंगुळा असतो, पण जेव्हा तो विरंगुळा लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा वाटू लागतो, तेव्हा त्याचा विचार होणे गरजेचे आहे. क्रिकेट बोर्डाकडे असलेला अफाट पैसा आणि खेळाडूंचे मानधन यांतील काही अंश जर या कठीण काळात जनतेच्या हितासाठी किंवा महागाई कमी करण्यासाठी वापरला गेला असता, तर तो खऱ्या अर्थाने 'राष्ट्रधर्म' ठरला असता. पण दुर्दैवाने, आपल्याला मैदानावरील चौकार-षटकारांच्या आकड्यांत रस आहे, गरिबाच्या डोळ्यांतील अश्रूंत नाही. वेळ आली आहे आत्मपरीक्षण करण्याची. जर आपण मानवी मूल्यांपेक्षा ग्लॅमरला अधिक महत्त्व देत असू, तर आपण एक समाज म्हणून अपयशी ठरत आहोत. युद्ध जगाच्या पाठीवर कुठेही होवो, पण त्याचे परिणाम भोगणारा हा 'सामान्य माणूस' जेव्हा रस्त्यावर उतरून आपल्या हक्काचे इंधन आणि अन्न मागेल, तेव्हा या क्रिकेटच्या मैदानावरील टाळ्या त्याला शांत करू शकणार नाहीत. मनोरंजनाचा हा अट्टाहास इतका मोठा असू नये की त्यात माणुसकीची हाक ऐकू येणार नाही. मनोरंजन आणि क्रीडा क्षेत्राचा विकास आवश्यक आहे, परंतु त्याचबरोबर रोजगारनिर्मिती, शिक्षण, आरोग्य, संशोधन, कृषी विकास आणि सामाजिक सुरक्षा यांवरही समान प्राधान्य दिले पाहिजे. आर्थिक विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे ही लोकशाहीची खरी कसोटी आहे. जगातील युद्धे थांबवणे कदाचित आपल्या हातात नसेल, पण आपल्या देशातील जनतेच्या वेदना समजून घेणे नक्कीच आपल्या हातात आहे. आयपीएलसारख्या स्पर्धा बंद करणे हा उपाय नाही. परंतु अशा भव्य आयोजनांकडे पाहताना देशातील महागाई, बेरोजगारी, शिक्षण आणि आरोग्याच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. एका बाजूला मनोरंजनाचा उत्सव आणि दुसऱ्या बाजूला सामान्य जनतेचा संघर्ष यामधील दरी कमी करणे हे शासन, उद्योगक्षेत्र आणि समाज या तिन्ही घटकांचे कर्तव्य आहे. क्रिकेटच्या या झगमगाटात सामान्य माणसाच्या जगण्यातील अंधार हरवू नये, एवढीच अपेक्षा. “ज्या समाजात काहींच्या हातात संपत्तीचे पर्वत उभे राहतात आणि अनेकांच्या हातात रोजगाराची संधीही नसते, त्या समाजाने विकासाच्या व्याख्येचा पुनर्विचार करणे गरजेचे असते.” आपण केवळ 'प्रेक्षक' म्हणून टाळ्या वाजवत राहणार की एक 'जागरूक नागरिक' म्हणून व्यवस्थेला प्रश्न विचारणार, हा खरा प्रश्न आहे.●●



नरेश साखरे
मो.9923086515

## लोकशाहीचे सजग प्रहरी व संघर्षाचे प्रतीक : जॉर्ज फर्नांडिस

आधुनिक भारतीय राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे कार्य आणि संघर्ष काळाच्या पलीकडे जाऊन प्रेरणादायी ठरतात. जॉर्ज फर्नांडिस हे त्यापैकी एक होते. कामगार चळवळीतील नेता, आणीबाणीविरोधी लढवय्या, समाजवादी विचारवंत, प्रभावी वक्ते आणि लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते अशी त्यांची ओळख होती. सत्तेपेक्षा तत्त्वांना अधिक महत्त्व देणाऱ्या या नेत्याने भारतीय राजकारणात आपली स्वतंत्र छाप निर्माण केली. ३ जून १९३० रोजी कर्नाटकातील मंगळुरू येथे जॉर्ज फर्नांडिस यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये स्वतंत्र विचारांची आणि अन्यायाविरुद्ध प्रश्न विचारण्याची वृत्ती होती. धर्मगुरू बनण्यासाठी त्यांना मिशनरीमध्ये पाठविण्यात आले होते, परंतु तेथील वातावरण त्यांना रुचले नाही. अखेर १९४९ मध्ये ते रोजगाराच्या शोधात मुंबईत आले. मुंबईतील सुरुवातीचे दिवस अत्यंत संघर्षमय होते. फुटपाथवर झोपणे, छोटी-मोठी कामे करणे अशा परिस्थितीत त्यांनी जीवनाचा प्रवास सुरू केला. मुंबईत आल्यानंतर त्यांनी कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले. डॉक कामगार, टॅक्सीचालक, हॉटेल कर्मचारी आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी त्यांनी लढा उभारला. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे आणि निर्भीड स्वभावामुळे ते लवकरच एक लोकप्रिय कामगार नेते बनले. समाजवादी नेते डॉ. राममनोहर लोहिया यांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. समाजातील वंचित, दुर्बल आणि शोषित घटकांसाठी संघर्ष करणे हीच त्यांची राजकीय भूमिका बनली. १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसचे बलाढ्य नेते एस. के. पाटील यांचा पराभव करून संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. हा विजय इतका अनपेक्षित होता की त्यांना ₹जायंट किलर₹ म्हणून ओळखले जाऊ लागले. या विजयामुळे राष्ट्रीय राजकारणात त्यांचे स्थान अधिक बळकट झाले. लोकसभेत त्यांनी सामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडली आणि सत्ताधाऱ्यांना कठोर प्रश्न विचारले. जॉर्ज फर्नांडिस यांच्या राजकीय जीवनातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९७४ चा ऐतिहासिक रेल्वे संप. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांनी देशव्यापी आंदोलन उभारले. जवळपास १७ लाख रेल्वे कर्मचारी या संपात सहभागी झाले. हा भारताच्या इतिहासातील सर्वात मोठ्या औद्योगिक आंदोलनांपैकी एक मानला जातो. सरकारने संप मोडून काढण्यासाठी कठोर कारवाई केली, परंतु या संघर्षामुळे जॉर्ज फर्नांडिस यांची प्रतिमा जनतेच्या मनात अधिक उंचावली. १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. लोकशाही मूल्यांवर झालेल्या या आघाताचा जॉर्ज फर्नांडिस यांनी तीव्र विरोध केला. ते भूमिगत राहून सरकारविरोधी चळवळ चालवत होते. याच काळात त्यांच्यावर 'बडोदा डायनामाइट प्रकरणा'त आरोप ठेवण्यात आले आणि त्यांना अटक करण्यात आली. हातात बेड्या घालून न्यायालयात उभ्या असलेल्या त्यांच्या छायाचित्राने लोकशाहीच्या संघर्षाचे प्रतीक म्हणून देशभर प्रसिद्धी मिळवली. १९७७ मध्ये आणीबाणी संपल्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांनी बिहारमधील मुजफ्फरपूर मतदारसंघातून विक्रमी विजय मिळवला. तुरुंगात असतानाच निवडणूक लढवून जिंकणे ही भारतीय लोकशाहीतील एक अभूतपूर्व घटना होती. जनता पक्षाच्या सरकारमध्ये त्यांना उद्योगमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली. उद्योगमंत्री म्हणून त्यांनी स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देणारी भूमिका घेतली. त्यांच्या कार्यकाळात कोका-कोला आणि आयबीएम यांसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतातून व्यवसाय बंद करावा लागला. हा निर्णय त्या काळात खूप चर्चेचा विषय ठरला. पुढे त्यांनी समता पक्षाची स्थापना केली आणि राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली. रेल्वेमंत्री म्हणून त्यांनी कोकण रेल्वे प्रकल्पाला गती दिली. कोकणातील दुर्गम भागांना देशाच्या मुख्य रेल्वे जाळ्याशी जोडण्याचे मोठे काम त्यांच्या काळात पुढे सरकले. लाखो नागरिकांच्या जीवनात बदल घडवून आणणाऱ्या या प्रकल्पामुळे त्यांचे नाव कायम स्मरणात राहील. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांनी संरक्षणमंत्री म्हणून काम केले. १९९८ च्या पोखरण अणुचाचण्या आणि १९९९ च्या कारगिल युद्धाच्या काळात त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. सैनिकांच्या समस्या समजून घेण्यासाठी ते सियाचीनसारख्या कठीण भागात स्वतः जात असत. सैनिकांशी थेट संवाद साधणारे आणि त्यांच्या मनोबलाची काळजी घेणारे संरक्षणमंत्री म्हणून त्यांची विशेष ओळख निर्माण झाली. जॉर्ज फर्नांडिस यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा साधेपणा. उच्च पदांवर असूनही त्यांनी कधीही सत्तेचा दिखावा केला नाही. सामान्य नागरिकांना सहज भेटणारा, स्वतःचे काम स्वतः करणारा आणि साधी राहणी जपणारा नेता म्हणून ते ओळखले जात. त्यांच्या घराचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी कायम खुले असत. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेपेक्षा माणुसकी आणि लोकशाही मूल्यांना त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांचे संपूर्ण आयुष्य संघर्ष, तत्त्वनिष्ठा आणि लोकहितासाठी समर्पित होते. त्यांनी कामगारांचे हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक न्याय यांसाठी सातत्याने लढा दिला. सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धैर्य आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची वृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. २९ जानेवारी २०१९ रोजी त्यांचे निधन झाले. मात्र त्यांच्या निधनाने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर भारतीय राजकारणातील संघर्षशील आणि तत्त्वनिष्ठ परंपरेचा एक महत्त्वाचा अध्याय संपला. आजही जॉर्ज फर्नांडिस यांचे नाव घेतले जाते ते लोकशाहीचे सजग प्रहरी, कामगारांचे खरे नेतृत्व करणारे योद्धा आणि सत्तेपेक्षा तत्त्वांना सर्वोच्च मानणारे व्यक्तिमत्त्व म्हणून. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे लोकशाही, सामाजिक न्याय आणि संघर्षाच्या मूल्यांना अभिवादन करणे होय.●●



वर्तमान



विकास मेश्राम
मो. 7875592800

## धम्मपद प्रबोधनाचा महान ग्रंथ



जगातील महान ग्रंथांचा विचार केला तर तथागत गौतम बुद्धांची वाणी जतन करणारा धम्मपद हा एक अद्वितीय आणि अमूल्य ग्रंथ म्हणून समोर येतो. धम्मपद म्हणजे केवळ धार्मिक ग्रंथ नव्हे, तर मानवाला नैतिक, विवेकी आणि सुखी जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा जीवनदर्शक ग्रंथ आहे. 'धम्म' म्हणजे नीती, शील, सदाचार आणि 'पद' म्हणजे मार्ग. अशा प्रकारे धम्मपदाचा अर्थ 'नीतीचा मार्ग' किंवा 'सदाचाराचा मार्ग' असा होतो. बुद्धांच्या शिकवणीचे सार या ग्रंथात अत्यंत संक्षिप्त, परंतु प्रभावी स्वरूपात मांडलेले आहे. प्रसिद्ध बौद्ध विद्वान भदंत आनंद कौशल्यायन यांनी धम्मपदाविषयी अत्यंत महत्त्वाचे उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, 'जर आयुष्यभरासाठी एकच ग्रंथ मित्र म्हणून निवडायचा असेल, तर धम्मपदापेक्षा श्रेष्ठ दुसरा ग्रंथ सापडणे कठीण आहे.' या विधानामागे मोठा जीवनानुभव आणि सत्य दडलेले आहे. कारण मानवी जीवन हे संघर्षांनी भरलेले आहे. प्रत्येक माणूस सुख-दुःख, यश-अपयश, लोभ-मोह, राग-द्वेष यांच्याशी सतत झुंज देत असतो. अशा वेळी योग्य मार्गदर्शन करणारा खरा मित्र जर कोणी असेल, तर तो धम्मपद आहे. तथागत बुद्धांनी आपल्या पंचेचाळीस वर्षांच्या धम्मकार्यकाळात असंख्य लोकांना दुःखातून मुक्तीचा मार्ग दाखविला. राजे, सामान्य प्रजा, स्त्री-पुरुष, भिक्षू, व्यापारी, शेतकरी, अगदी चोर-दरोडेखोरांपर्यंत सर्व स्तरांतील लोक बुद्धांकडे आले. बुद्धांनी त्यांच्या जीवनातील समस्यांचे मूळ शोधून त्यांना योग्य मार्ग दाखविला. धम्मपदातील गाथा या अशाच विविध प्रसंगांमध्ये बुद्धांच्या मुखातून निघालेल्या अमृतवाण्या आहेत. त्यामुळे या गाथा केवळ सैद्धांतिक नाहीत, तर जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण झालेल्या आहेत. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणसाने प्रचंड भौतिक प्रगती केली आहे. तो विमानाने जगभर फिरतो, संगणकाच्या माध्यमातून क्षणार्धात संवाद साधतो, अंतराळात पोहोचतो. परंतु मानसिक दृष्ट्या तो अजूनही राग, लोभ, मोह, मत्सर, द्वेष यांसारख्या विकारांपासून मुक्त झालेला नाही. उलट हे विकार अधिक तीव्र स्वरूपात वाढताना दिसतात. भ्रष्टाचार, हिंसा, शोषण, अन्याय आणि गुन्हेगारी यांचे प्रमाण वाढलेले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांची वाणी आणि धम्मपदातील शिकवण अधिकच महत्त्वाची ठरते. धम्मपद मनुष्याला सांगते की दुःखाचे मूळ बाहेर नसून आपल्या मनात आहे. मन शुद्ध झाले तर जीवनही शुद्ध होते. म्हणून बुद्ध म्हणतात की मन हे सर्व गोष्टींचे अग्रस्थान आहे. मन चांगले असेल तर सुख निर्माण होते आणि मन दूषित असेल तर दुःख निर्माण होते. ही शिकवण आजच्या मानसिक तणावाने ग्रस्त समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहे. धम्मपदात एकूण ४२३ गाथा आहेत. या गाथांमध्ये बुद्धांच्या संपूर्ण धम्माचा सार समाविष्ट आहे. शील, समाधी आणि प्रज्ञा या त्रिसूत्रीवर आधारित जीवनपद्धतीचे वर्णन येथे आढळते. चार आर्यसत्ये, आर्य अष्टांगिक मार्ग, करुणा, मैत्री, अहिंसा, संयम, सत्य, क्षमा, प्रज्ञा आणि निर्वाण या सर्व विषयांचे सखोल विवेचन धम्मपदात आहे. त्यामुळे धम्मपदाला संपूर्ण त्रिपिटकाचा सारग्रंथ असेही म्हटले जाते. आचार्य बुद्धघोष यांनी धम्मपदातील गाथांशी संबंधित प्रसंगांचे वर्णन करणारी धम्मपद अट्ठकथा लिहिली. या अट्ठकथेमुळे प्रत्येक गाथेचा संदर्भ आणि अर्थ समजणे अधिक सोपे झाले. पुढे अनेक विद्वानांनी विविध भाषांमध्ये धम्मपदाचे भाषांतर केले. त्यामुळे हा ग्रंथ जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. आज जगातील जवळजवळ सर्व प्रमुख भाषांमध्ये धम्मपद उपलब्ध आहे. धम्मपदाचे इंग्रजीत भाषांतर करणारे भदंत वेरागोडा सारद महाथेरो यांनी आपल्या Treasury of Truth या ग्रंथात नमूद केले आहे की धम्मपदामध्ये अशी विलक्षण ऊर्जा आहे की ती मनुष्याच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवू शकते. असंख्य लोकांनी या शिकवणीचा स्वीकार करून शांतता, समाधान आणि आनंद प्राप्त केला आहे. आधुनिक जीवनातील तणाव, नैराश्य आणि अस्थिरता यावर धम्मपद प्रभावी उपाय सुचवते. धम्मपदाची एक मोठी वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्याचा मानवकेंद्री दृष्टिकोन. इतर अनेक धार्मिक परंपरांमध्ये ईश्वर किंवा दैवी शक्तीला केंद्रस्थानी ठेवले जाते. परंतु बुद्धांची शिकवण मनुष्याला केंद्रस्थानी ठेवते. बुद्ध सांगतात की मनुष्याचे भविष्य त्याच्या स्वतःच्या कर्मांवर अवलंबून असते. कुठलाही देव किंवा अलौकिक शक्ती त्याचे दुःख दूर करू शकत नाही. मनुष्याने स्वतः प्रयत्न करून आपली उन्नती साधावी लागते. म्हणूनच बुद्धांनी 'अत्त दीपो भव' म्हणजे 'स्वतःच स्वतःचा दीप बना₹ हा संदेश दिला. धम्मपदात शीलाला अत्यंत महत्त्व दिले आहे. शील म्हणजे नैतिक आचरण. खोटे बोलू नये, चोरी करू नये, हिंसा करू नये, व्यसनांपासून दूर राहावे, इतरांच्या हिताचा विचार करावा, हा शीलाचा पाया आहे. शीलामुळे मन शुद्ध होते. शुद्ध मनातून समाधी निर्माण होते आणि समाधीतून प्रज्ञा विकसित होते. प्रज्ञेमुळे मनुष्याला वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञान प्राप्त होते. हीच निर्वाणाकडे नेणारी वाट आहे. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी भारतीय समाजाला बुद्धांच्या धम्माची ओळख करून दिली आणि लाखो लोकांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण केले. त्यांनी बुद्धांच्या विचारांना आधुनिक सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांशी जोडले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज लाखो लोक धम्मपद वाचत आहेत, समजून घेत आहेत आणि आपल्या जीवनात त्याचा उपयोग करीत आहेत. डॉ. बाबासाहेबांनी लावलेल्या या प्रबोधनाच्या बागेत आज असंख्य प्रतिभावंत फुले उमलत आहेत. धम्मपदातील प्रत्येक गाथा ही जीवनाला दिशा देणारी आहे. क्रोधावर विजय कसा मिळवावा, लोभ कसा टाळावा, मैत्री कशी वाढवावी, दुःखातून मुक्ती कशी मिळवावी, याचे सोपे आणि व्यावहारिक मार्गदर्शन या ग्रंथात आहे. त्यामुळे धम्मपद हा केवळ वाचनासाठी नसून आचरणासाठीचा ग्रंथ आहे. त्यातील शिकवणीचा स्वीकार करूनच त्याचे खरे महत्त्व समजते. आजच्या नव्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताणतणाव, व्यसनाधीनता, हिंसाचार आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे युवक संभ्रमित झालेले दिसतात. अशा वेळी धम्मपद त्यांना विवेक, संयम, आत्मविश्वास आणि करुणेचा मार्ग दाखवते. म्हणून प्रत्येक युवकाने, प्रत्येक कुटुंबाने आणि प्रत्येक समाजघटकाने धम्मपदाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शेवटी असे म्हणता येईल की धम्मपद हा केवळ बौद्धांचा ग्रंथ नाही, तर संपूर्ण मानवजातीचा मार्गदर्शक आहे. त्यातील शिकवण काळाच्या कसोटीवर खरी उतरलेली आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी जितकी ती उपयुक्त होती, तितकीच ती आजही आहे आणि भविष्यातही राहील. मानवी जीवनाला शांती, समाधान आणि प्रज्ञेची दिशा देणारा हा महान ग्रंथ प्रत्येकाच्या घरात आणि मनात असला पाहिजे. बुद्धांनी दाखविलेल्या या मार्गावर चालूनच मनुष्य आपले जीवन खऱ्या अर्थाने सुखी, समृद्ध आणि अर्थपूर्ण बनवू शकतो. धम्मपदाचे नियमित वाचन, चिंतन आणि आचरण हीच बुद्धांना खरी अभिवंदना ठरेल.●●

तथागताची सत्यगाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

## उपवर्गीकरणाची दाहकता आणि जनगणनेचे महत्व



आलीकडे जेष्ठ पौर्णिमा निमित्त 'प्रज्ञा ज्योत विहार', जरीपटका येथे मला व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते. विषय होता 'अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण योग्य आहे काय' ? विशेष अतिथी भगवान निमगडे तर सामाजिक कार्यकर्ते नीलकंठ बहादुरे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन शिस्तबद्ध होते. कार्यक्रम सकाळी दहा वाजता नियोजित वेळेनुसार सुरु झाल्यामुळे सामुहिक भोजनाचा कार्यक्रम वेळेवर संपन्न झाला. बहुतेकांनी आपापल्या घरून जेवण आणले होते, ही संकल्पना भावली. या विहाराला बौद्ध संस्कृती जोपासण्याचा २० वर्षाचा वारसा लाभला आहे. नियमित वंदना घेणे, प्रत्येक पौर्णिमा, दिनविशेष साजरे करणे ही प्रज्ञा ज्योत विहाराचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी विहाराचे कार्यकर्ते, उपासक उपासिका अभिनंदनास पात्र आहेत. व्याख्यान सुरु होण्यापूर्वी चर्चेत एका कार्यकर्त्यांनी महत्वाची शंका उपस्थित केली. ती म्हणजे जनगणनेत काही लोकांचा जातीच्या रकाण्यात 'महार' लिहिण्याचा आग्रह आहे, हे योग्य आहे काय ? या प्रकारच्या शंकेतून जनगणनेत काय नोंद करावी, या संबंधी समाजात अजुनही संभ्रम असल्याचे स्पष्ट होते. आज उपवर्गीकरणाचा प्रश्न केवळ राजकीय किंवा प्रशासकीय नाही, तर तो अनुसूचित जातीच्या भवितव्याशी संबंधित आहे. बौद्ध समाजाची प्रगती ही इतरांची पोटदुखी आहे. त्यामुळे अनुसूचित जातीतील आरक्षणात वर्गीकरण आणले. अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण म्हणजे त्या प्रवर्गातील विविध जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाचे वाटप करणे होय. अशा परिस्थितीत महार, मांग, चर्मकार आणि इतर जातीची लोकसंख्या किती आहे हा निर्णायक प्रश्न निकाली लागणार आहे. जर एकाद्या समाजाची वास्तविक लोकसंख्या जनगणनेत नोंदणी गेली नाही तर त्याचा परिणाम भविष्यातील त्या समाजाच्या आरक्षणाच्या वाट्यावर होउ शकतो. म्हणूनच अनुसूचित जातीतील प्रत्येक घटकांनी आपली संख्या अचूकपणे नोंदवणे गरजेचे झाले आहे. या संदर्भात कायद्याची भूमिका स्पष्ट आहे. संविधान (अनुसूचित जाती) आदेश १९५० आणि त्या नंतरच्या कायद्यातील सुधारणा नुसार धर्म : बौद्ध, जात : महार अशी नोंद झाल्यासच संबंधित व्यक्तीची गणना अनुसूचित जातीमध्ये केली जाणार आहे. अन्यथा त्या व्यक्तीची गणना खुल्या प्रवर्गात नोंदविली जाण्याची शक्यता आहे. परिणामी अनुसूचित जातीतील संबंधित समाजाची लोकसंख्या कमी दाखविली जाणार, हा मोठा धोका आहे. त्यामुळे असे गैरसमज दूर करणे आवश्यक वाटते. जनगणनेत जात 'महार' अशी नोंद करण्याचा आग्रह म्हणजे कोणालाही हिंदू महार म्हणण्याचा प्रकार नाही. हा भावनेचाही प्रश्न नाही. उलट धर्म 'बौद्ध' जात 'महार' अशी स्पष्ट व कायदेशीर नोंद करण्याची बाब आहे. १९९० नंतरच्या कायदेशीर सुधारणामुळे धर्मांतरीत बौद्धांना अनुसूचित जातीचे घटनात्मक हक्क कायम ठेवण्यात आले आहे. त्यामुळे बौद्ध ही ओळख अभिमानाने आणि कायदेशीर हक्कासह नोंदविणे पूर्णपणे योग्य आहे. धर्म बौद्ध, जातीच्या रकाण्यात महार लिहिण्याच्या मताचे आजपर्यंत अनेक लेख बहुजन सौरभ मध्ये प्रकाशित झाले आहेत. 'महार' नोंद नाईलाजाने करावी लागणार आहे. तसा 'महार' हा शब्द आज प्रचारात नाही, धर्मांतरानंतर त्याचे महत्व राहिले नाही. परंतु प्रत्येक जातीची गणना होत असतांना जातीच्या रकाण्यात आपली जात लिहिणे अग्रक्रमाचे ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती म्हणजे केवळ 'अस्पृश्य नव्हे तर ऐतिहासिक दृष्ट्या वंचित समाज घटक' असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे सामाजिक न्यायांच्या प्रश्नाकडे भावनिकतेपेक्षा वास्तववादी दृष्टिने पाहण्याची गरज आहे. जनगणना ही केवळ आकडेवारी नसते. ती सामाजिक न्याय विभागाच्या योजना उदा. शिष्यवृत्ती, फी माफी, वसतिगृहे, महात्मा फुले महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना, दलित वस्ती सुधार योजना या सारख्या अनेक कल्याणकारी योजनांचे नियोजन जनगणनेतील आकडेवारीच्या आधारावर केले जाते. इतकेच नव्हे तर ग्राम पंचायत, नगरपालिका, विधानसभा आणि लोकसभेतील राखीव मतदारसंघ निश्चित करतानाही अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा आधार घेतला जातो. समाजाची शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थिती समजून घेण्यासाठी जनगणना महत्वाची असते, आहे. सध्या घरगुती जनगणनेची प्रक्रिया सुरु झाली आहे. भविष्यात धर्म आणि जातीची जनगणना सुद्धा होणारच आहे. या पार्श्वभूमीवर समाजिक जाणीव असलेल्या लेखक, वक्ते आणि कार्यकर्त्यांनी समाजातील गैरसमज दूर करण्याचे कार्य केले आहे. अर्थात जनगणनेत भावनिक दृष्टीपेक्षा कायदेशीर आणि सामाजिक वास्तव समाजासमोर मांडण्याची गरज आहे. कारण आज उपवर्गिकरणाचा प्रश्न दाहक, अस्मितेचा बनला आहे. येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य लक्षात घेता जनगणनेत योग्य नोंद होणे महत्वाचे आहे. त्याचे परिणाम आरक्षण, प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायावर दिसून येणार आहे. त्यामुळे प्रत्येक बौद्धांनी धर्म 'बौद्ध' आणि जात 'महार' अशी नोंद केली तरच बौद्धांच्या लोकसंख्येचे वास्तव प्रतिबिंब जनगणनेत उमटले जाणार आहे. धर्मांतरित बौद्धांचे हित लक्षात घेता डॉ. बाबासाहेबांचे खालील विचार अत्यंत प्रेरक वाटतात. ९ मार्च १९२४ रोजी दामोदर हॉल येथील सभेत डॉ. बाबासाहेब म्हणतात, “मी मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग केवळ माझे कुटुंब व माझी जात यासाठी करणार नाही. मी सर्व अस्पृश्य समाजाच्या चळवळीसाठी तिचा उपयोग करणार आहे, त्यासाठी मी अनेक योजना आखलेल्या आहेत. त्या सफल झाल्यावर अस्पृश्य समाज व स्पृश्य समाज यांचा फायदा होईल. अस्पृश्यांचे प्रश्न बिकट आहेत. ते पूर्ण सोडवू शकणार नाही, याची मला जाणीव आहे. पण ते सर्व प्रश्न जगाच्या चव्हाट्यावर मांडून मी त्याकडे जगाचे लक्ष वेधू शकेल, इतका माझा आत्मविश्वास आहे. अस्पृश्यांची समस्या म्हणजे प्रचंड हिमालय आहे. या हिमालयाशी टकरा मारून मी माझे डोके फोडून घेणार आहे. हिमालय कोसळला नाही तरी माझे रक्तबंबाळ डोके पाहून सात कोटी अस्पृश्य लोक तो हिमालय जमिनदोस्त करण्यास एका पायावर उभे होतील व त्यासाठी प्राणार्पण करतील. आपापसात जर तेढ पिकवीत राहतील तर मग मलाच काय, पण प्रत्यक्ष परमेश्वरालाही याबाबत काही करता येणार नाही. ( भाषण खंड १८ (३) पृष्ठ ११. ) अर्थात वरील संदेशाप्रमाणे आंबेडकरी समाजास आपापसात एकोपा ठेऊन येणाऱ्या संकटाला सामोरे जाणे आपले कर्तव्य ठरते.●●



श्रीराम बनसोड,
8208617748

# झुरळांची स्वप्नवत चळवळ...

जगातील अधिकांश सत्ताधिश वर्तमानात प्रामाणिक आणि टोकदार प्रश्न विचारणारे पत्रकार, स्टॅण्ड अप कॉमेडियन, टॉक शो मध्ये उणिवांवर बोट ठेऊन नर्म विनोदी शैलीत कार्यक्रम सादर करणारे अँकर यांच्यावर दबाव टाकून कार्यक्रम बंद पाडतात किंवा लेखन प्रकाशित होऊ नये यासाठी प्रयत्न करतांना दिसतात. अमेरिका ही मुक्त आणि प्रगत लोकशाही व्यवस्था मानली जाते. तर, याच अमेरिकेत एका चॅनल वर पत्रकार स्टीफन कॉलबर्ट टॉक शो सादर करीत असत.जवळपास अकरा वर्ष त्यांनी आपल्या शो द्वारे सरकारच्या (पर्यायाने राष्ट्राध्यक्षांच्या)विविध निर्णय, कृतींवर विनोदी शैलीत भाष्य करीत कार्यक्रम सादर केलेत. त्यांना प्रेक्षक संख्या प्रचंड लाभली होती. वर्तमान राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यावर त्यांनी कार्यक्रमात केलेल्या टीकेमुळे ट्रम्प नाराज झालेत आणि चिडून चॅनेल वर दबाव आणला. त्यामुळे चॅनलला शो बंद करणे भाग पडले. यानंतर ट्रम्प यांनी एक ए आय निर्मित व्हिडिओ तयार करून त्या पत्रकाराला कचऱ्याच्या डब्यात बंद करतांना दाखवले. सत्ताधीशांना विनोदही का रुचत नाही ते कळायला मार्ग नाही. कदाचित वर्मावर घाव केल्या जात असावा. अमेरिकेतच नाही तर आपल्या देशातही स्टँड अप कॉमेडियन, इन्फ्लुएन्सर, कंटेंट क्रिएटर, छोटे यू ट्यूबर पत्रकार अश्या समस्यांशी सामना करतांना दिसतात. कुणाल कामरा, समय रैना, वरुण ग्रोवर,राफेल गांधी,अमेय देशपांडे, महेंदर सिंग यासह अनेक यू ट्यूबर विषयानुरूप सटीक भाष्य करून दुसरी बाजू उघडकीस आणतात. मुख्य धारेतील माध्यमांवर विविध उद्योगपतींचा ताबा, सरकारचा त्यावर वरदहस्त आणि दबाव त्यामुळे विविध चॅनेल वरील






पत्रकार केवळ सरकारची पाठराखण करणारी बाजू प्रेक्षकांसमोर ठेवतात हा आपला अनुभव आहे. राजेशाही काळात विदुषक दरबारात नियुक्त केले जात होते. ते राजाची स्तुती आणि मनोरंजन तेवढे करायचे. याउलट लोककलाकार आपल्या कला सादरीकरणातून मात्र उणिवांवर भाष्य करायचे अभ्यासाअंती हे जाणवते. तर मुख्य मुद्दा असा की, काही दिवसापूर्वी 'कॉकरोच जनता पार्टी' ऑन लाइन स्थापन करून अभिजित दिपके यांनी धमाल उडवून दिली. बोस्टन (अमेरिका) विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असलेल्या या युवकाने युवकांच्या मनातील भावनांचा उद्रेक, निराशा, व्यवस्थेने हताश झाल्यांमुळे अभिव्यक्त होण्याची संधी मिळवून दिली आणि देशात चर्चेला तोंड फुटले. अवघ्या काही दिवसात समाज माध्यमांवरील विविध प्लॅटफॉर्म वर त्यांनी ज्या कल्पकतेने ए आय निर्मित व्हिडिओ किंवा पोस्टर्स जारी केलेत त्याचा प्रभाव असा झाला की दोन करोड लोक/युवा या चळवळीशी जोडले गेल्याची आकडेवारी समोर आली आहे. ही बाबी आश्चर्यकारक अशीच. व्यवस्थेतून आलेली हताशा झटकण्यासाठी ही मोहीम सहाय्यक ठरत असल्याचे हे निदर्शक आहे. हे सर्व मा. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्या एका टिपणीतून आकाराला आले. एका प्रकरणात युवक आणि झुरळ यांचा सहसंबंध जोडल्याने ही स्वयंस्फूर्त चळवळ उभी राहिली.( त्याच वेळी भाष्य करतांना मा.मुख्य न्यायमूर्ती देशात तीस ते चाळीस टक्के वकिलांची पदवी बोगस असल्याचे म्हणतात.त्याची सी बी आय चौकशी व्हावी अशी सूचना करतात.बार कौन्सिल ऑफ इंडिया त्यांच्या या मताशी सहमती दर्शविते. नीट, सीबीएसइ यातील भ्रष्टाचार आणि घोळ चर्चेत आहे.अर्थात शिक्षण क्षेत्र किती भ्रष्ट आहे हे यावरून लक्षात यावे.) वाढता प्रतिसाद बघून ऑन लाइन असणारे सर्व प्लॅटफॉर्म आता बॅन किंवा सस्पेंड करण्यात आल्याचे अभिजित दिपके यांनी व्हिडिओ संदेशात म्हटले आहे. नागरिक म्हणून मागील काही चळवळींची उजळणी करणे गरजेचे आहे. डॉ. सिंग यांचे सरकार असताना भ्रष्टाचाराच्या नावावर उभे राहिलेले अण्णा आंदोलन, त्याला मिळणारी प्रसिद्धी,त्यातून उभे राहिलेले नेतृत्व, त्या आंदोलनाचा राजकीय लाभ कुणाला झाला. त्या चळवळी मागे आर्थिक स्रोत कुणाचा होता. नंतरच्या निवडणुकात त्यातून विकसित झालेल्या नेतृत्वाने नेमका कोणत्या पक्षाला कश्या पद्धतीने अधिक लाभ मिळवून मिळू दिला. याचे तपशील आणि विश्लेषण आता उपलब्ध आहेत. ते चौकसपणे न्याहाळले तर सर्व चित्र स्पष्ट होते. या आधीही देशात युवा चळवळी झाल्याचा इतिहास आहे. आसाममध्ये आसामी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद लाभला. ते सत्तेतही आलेत. पुढची वाताहत आपण जाणतो. आज या युवकांचा आवाज क्षीण आहे. आणीबाणी नंतर जे पी यांच्या आंदोलनात मोठ्या संख्येने युवक सहभागी होते. त्यामुळे सरकार पडले. पण ज्या स्वप्नांना घेऊन युवक सामील झाले होते ती प्रत्यक्षात उतरू शकली नाही. त्याचा लाभ मात्र नंतरच्या काळात कुणी उठवला हे सर्व विदित आहे.महाराष्ट्रात दलित पँथरची चळवळ युवकांची होती.या चळवळीने दलित, वंचित समुदायात आत्मविश्वास आणि आंदोलनाची उर्मी निर्माण केली. पण, ही ऊर्जा फार काळ टिकली नाही. पुढचा इतिहास आपल्याला ठाऊक आहे.अण्णा आंदोलनात युवा विविध समाज माध्यम प्लॅटफॉर्म वरून व्यक्त होत



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

होता त्यामुळे एक वातावरण पद्धतशीर रित्या निर्माण झाले आणि सरकार बदलले. कॉकरोच जनता पार्टी बाबत कोणताही निर्णय घाईचा ठरेल. पार्टी म्हणून प्रत्यक्षात ते मैदानात उतरतील की नाही हे भविष्यात कळेल. पण सद्यस्थितीत युवकांमध्ये जी चीड निर्माण झाली आहे ती या निमित्ताने व्यक्त होतांना दिसते. बेरोजगारी, महागाई, रोजगाराच्या अपुऱ्या संधी, धार्मिक द्वेषाची झालेली पेरणी, पेपर फुटी, युवकांच्या रोजगार विषयक प्रश्नांना समाधानकारक न मिळणारी उत्तर.... अश्या चक्रव्युहातील युवकांना योग्य दिशा गवसली तर उत्तमच.●●

# कर्ण

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

दानशूर म्हणवल्या जाणाऱ्या महापराक्रमी कर्णाची ही सर्वात मोठी चूक नव्हती की तो चुकीच्या प्रवृत्ती सोबत होता तर चूक ही होती की, तो चूकीच्या प्रवृत्तींशी ईमान राखून होता. यातून शिकण्यासारखी गोष्ट म्हणजे कधीकधी चांगुलपणा हा सुद्धा वाईट किंवा चूकीच्या जागी ऊभा राहतो तेव्हा त्याला सुद्धा हार पत्करावी लागते. बदनामी सहन करावी लागते. याऊलट काही उदाहरणे अशी आहेत की, जे भलेही आज जिंकले असतील पण हा विजय तकलादू असतो. तो दिर्घकाळ टिकत तर नाहीच पण या विजयाला समाजात मानमान्यता कधीही मिळत नसते. कारण असे म्हणतात की, ‘जिवन शुरू होता है खाली किताब से, और ख़त्म होता है, कर्मों के हिसाब से ‘कर्माचा हिशेब जेव्हा चुकवण्याची वेळ येते तेव्हा होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही. सर्वकाही नियतीने ठरवलेले असते आपल्याला त्याची वेळ कधी येईल हे कळत नाही एवढेच. म्हणून चांगूलपणा कधी सोडू नये. ‘सच्चाई के इस जंग में, कभी झूठे भी जीत जाते है, समय जब अपना अच्छा न हो तो, कभी अपने भी रूठ जाते हैं, कच्चे मकान देखकर कभी किसीसे रिश्ता न तोड़ना, क्योंकि मिट्टी की पकड़ बहुत मजबूत होती हैं, संगमरमर पर तो अक्सर पैर फिसल जाते हैं. ●●

बहुजन सौरभ

# भारतीय संविधान आणि शासन

भारतीय संविधान सभेत अस्पृश्याच्या हिताचे संवर्धन व्हावे या दृष्टीने बाजू मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच आदिवासींच्या हिताची मांडणी करणारे १९१८ सालचे हाकी ऑलिंपिक विजेत जयपालसिंग मुंडा हे होते. नेहरूंनी प्रथमदर्शनी मांडलेल्या संविधानाच्या ध्येय धोरणाच्या प्रस्तावावर क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या विचाराचा वारसा असलेल्या जयपालसिंग मुंडा यांनी आदिवासी लोकांच्या समस्यावर प्रकाश टाकतांना आदिवासी या देशाचे मूळनिवासी असून बाहेरून आलेल्या आर्यांना त्यांच्या संस्कृतीवर आक्रमण करून त्यांना अत्यंत दयनीय आणि निंदनीय अवस्थेत आणून रानावनात राहण्यास भाग पाडले. आज आपण स्वतंत्र भारताच्या मानवी समतेचा विचार करतांना आदिवासी आणि अस्पृश्य यांच्या वेदनांची दखल घेऊन त्यांना मानवी जीवनाच्या मुख्य धारेत आणण्यासाठी त्यांना प्राधान्य देवून विकासाची संधी उपलब्ध करून देणे ही शासनकर्त्याची जबाबदारी असल्याचे मत नोंदवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ध्येय धारणाच्या प्रस्तावार मत मांडतांना फ्रेंच राज्यक्रांतीचा स्वातंत्र्य, समता, बंधुता हा मानवी हक्कांचा जाहिरनामा भारतासारख्या परंपरावादी देशाच्या ध्येय धोरणाचा आदर्श ठरावा, हे स्वागतार्ह पाऊल असले तरी त्यात सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी सरकारचे काय धोरण राहील याचा उल्लेख नसल्यामुळे तो अपुरा असल्याचे मत मांडले. संविधान सभेनी ही दुरूस्ती स्विकारून ध्येय धोरणाचा ठराव एकमताने पारित केला. संविधान सभेच्या दि. २६ नोव्हेंबर १९४९ च्या शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, केवळ राजकीय न्याय उपलब्ध करणे म्हणजे लोकशाही म्हणता येणार नाही. राजकीय न्यायाव्यतिरिक्त मानवाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात रक्त विहीन मार्गाने क्रांतीकारक बदल घडवून आणणारी शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही होय. त्यामुळे राजकीय क्षेत्रात एक माणूस एक मूल्य हा अधिकार संविधानाद्वारे प्रस्थापित करून राजकीय समता निर्माण केली. परंतु सामाजिक व आर्थिक क्षेत्रात ती निर्माझा करण्याची जबाबदारी शासनकर्तावर सोपवली आहे. अशा प्रकारची समता निर्माण करण्यात शासनकर्ते अपयशी ठरले तर मोठ्या कष्टाने निर्माण केलेला हा लोकशाही शासन व्यवस्थेचा डोलारा सामाजिक आणि आर्थिक न्यायापासून वंचित असलेले लोक उलथून टाकल्याशिवाय राहणारा नाही, असा इशारा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीचे हे संकेत अलिकडे बंगला देश आणि नेपाळमध्ये झालेल्या उग्र आंदोलनातून प्रत्यक्षात उमटले, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मूल्याचे जतन करून सामाजिक व आर्थिक न्यायाची हमी दली असली तरी काही पक्षाचे विषमतावादी वर्णव्यवस्थेचे धोरण आड येत असल्यामुळे सामाजिक सामंजस्याचा बुरखा ओढून समरसतेचा पुरस्कार करतांना दिसतात. संविधानाच्या मूळ आशयाला ते आव्हान असल्यामुळे अशा विचारधारेपासून सतर्क राहणे गरजेचे आहे. भारतात लोकशाही शासनपद्धती नवी नाही. बुद्ध काळात अनेक गणराज्य होती. गणाचा प्रमुख या अर्थाने राजा गणाधीश म्हणून ओळखले जाई. विधान भवनाला संथागार म्हणून ओळखले जाई, सभापती संथागाराचा प्रमुख म्हणून विनयपिटकाच्या नियमानुसार संचालन करीत असे. आधुनिक संसदेला लागू असलेली कार्यपालन संहिता ही संघ्याच्या विनयपिटकाची प्रतिकृती होय. भारतातून नष्ट झालेल्या या लोकशाही शासन पद्धतीचे आपण जतन करू शकलो नाही, तर लोकशाहीची जागा हुकूमशाही घेतल्याशिवाय राहणार नाही. संविधान हे विधीमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायसंस्था यांना बांधून ठेवणारे शस्त्र आहे. हे तीनही अंग एकमेकापासून भिन्न तसेच परस्पर पूरक देखील आहेत. लोकशाही मूल्याचे जतन करण्याची जबाबदारी या तीनही अंगावर आणि त्यात कार्यरत असलेल्या लोकांवर आणि पक्षांवर आहे. राष्ट्रीय पक्ष या अंगाचा उपयोग पक्षीय ध्येय धोरणानुसार






करत असतील तर संविधान अपयशी ठरेल. परस्परांत श्रेष्ठतेचा भाव निर्माण करून आव्हानात्मक कोंडी निर्माण करणे राष्ट्रहिताचे नाही, सोनाराने कान टोचावे अशी अवस्था निर्माण करणे होय. भारतीय लोकशाही पडित जमिनीतील वरचे आवरण आहे हे लक्षात घेऊन संविधान निर्मात्यांनी सीबीआय, ईडी, निवडणूक आय.5ोग, रिझर्व बँक, सेंट्रल ऑडीटसारख्या संस्था संविधानाद्वारे निर्माण करून त्या आपापल्या क्षेत्रात निःपक्षरित्या स्वतंत्रपणे कार्यदक्ष राहतील हा भाव होता. परंतु शासन व्यवस्थेच्या आंतर द्वंवदामुळे आपले स्वतंत्र अस्तित्व, निरंकुशता हिरावून बसल्या आणि शासनकर्त्याच्या दबावाखाली पिंजऱ्यातील तोत्याप्रमाणे वावरत आहेत. सशक्त लोकशाहीकरता हे चित्र बदलणे आवश्यक आहे. आपण सारे भारतीय बांधव एक आहोत या दृष्टीने बंधुत्वाची भावना निर्माण होणे राष्ट्र निर्मिती करीता आवश्यक आहे. जातीयतेचा उच्च निचतेच्या भावनेमुळे जातीय तणाव सांप्रद्रायिकता वाढत असेल तर ती लोकशाहीच्या विकासासाठी हानीकारक असल्याची संविधान निर्मात्यांनी दखल घेवून समाज जीवनात सामंजस्य निर्माण करण्याची जबाबदारी शासनकर्त्यावर टाकली आहे. जॉन स्टुअर्ट मील म्हणतात, मनुष्य कितीही मोठा मुत्सद्दी, विद्वान असला तरी

ॲड. मदन उके
मो. ९९२३२८२५२८

व्यक्ती पुजेनी त्याचे अवमुल्यन होते, तो हुकूमशहा होण्याच्या मार्गावर जाण्याची शक्यता अधिक असते. आजच्या भारतात व्यक्ती पूजेचे हे चित्र बळावत असल्याने लोकशाहीला धोका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विचाराचे समर्थक होते, संविधानाच्या यशस्वीतेकरिता शासनकर्त्यात घटनात्मक नितीमत्ता निर्माण होणे आवश्यक आहे. शासनकर्ते योग्य असतील तर लोकशाही मूल्याचे जतन करू शकतात. किंबहुना चांगले संविधान देखील दुर्बल होवू शकते. वर्तमानातील शासक या बाबतीत संवेदनशील न राहता संयम आणि विवेक या सद्गुणांचा अभाव सल्याचे दृश्य नजरेत येत आहे. सांविधानिक गतिरोध हेतू पुरस्कृत केला जातो. भारतात बहुसंख्यता राजकीय नसून जातीय आहे. अशा बहुसंख्यकांचे राज्य अल्पसंख्याकानी स्विकारले आहे. त्यामुळे अल्पसंख्याकांसाठी संविधान निर्मात्यांनी काही तरतूदी करून त्यांच्या हिताचे रक्षण केले आहे. अल्पसंख्याकांना गोंजारणे चुकीचे असले तरी अल्पसंख्याकाच्या विरोधात जातीय अथवा सांप्रदायिक उन्माद निर्माण करण्याचे धोरण जोपावेतो कायम आहे, तोपावेता त्यांच्या हिताचे रक्षण करणे शासनाची जबाबदारी असल्यामुळे संविधान त्याची दखल घेऊन काही सोयी निर्माण केल्या आहेत. समाज स्वास्थ्यासाठी ते आवश्यक आहे. आर्थिक व्यवहारात शासनाचा कमीतकमी हस्तक्षेप असावा या विचाराशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असहमत होत. राजकीय लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आर्थिक लोकशाहीची जोड आवश्यक असल्याचे ते मानत. शासनाने आर्थिक व्यवहाराचे नियमन केले नाही तर एकाधिकार निर्माण होवून भांडवलवादी अधिसत्ता गाजविण्यास प्रवृत्त होतील. भांडवलशाही सामाजिक जाणिवेतून मुक्त होईल. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे श्रमिकांचे व शेतमजुरांचे शोषण वाढत जाईल, बलाढ्य खाजगी कंपन्या जगात अधिपत्य निर्माण करतील व अल्प उद्योजक बेकारीच्या रांगेत फेकल्या जाईल. सरकारच्या उदात्तीकरण धोरणामुळे मुक्त अर्थव्यवस्था प्रभावी ठरली. त्यामुळे कामगार शब्दाचा अर्थच बदलला. शासक शासकीय भागभांडवल विकून जबाबदारीतून मुक्त झाला. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगाराचे संकट वाढत जावून समाज जीवनात अस्थिरता निर्माण होत आहे. शेतमजुराचा प्रश्न भयावह आहे. वर्षभर शेतीची कामे उपलब्ध नसल्याने शेतमजूर शहराकडे पलायन करत आहे. त्यामूळे शहरी विभागात निवारा, पाणी, स्वास्थ्य या समस्या वाढीस लागून शहरी व्यवस्था कोलमडली आहे. समाजात जातिव्यवस्था नाहीशी होण्याऐवजी जातच घट्ट होत आहे. देवतांचे स्तोम माजले असून भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे. साऱ्या समस्यांकडे सरकारची उदासीनता जनमाणसात अस्वस्थता निर्माण करीत आहे. शासन स्वातंत्र्य, समता, बंधुता यावर आधारित लोकशही समाजवाद या आदर्शप्रत उदासीन असून वर्णव्यवस्थेच्या उच्चिनिचतेवर आधारित धर्माधिष्ठित राष्ट्रवाद या धोरणाचे पाठीराखे असल्यामुळे जगाने गौरविलेले भारतीय संविधान लोकांच्या इच्छा आकांक्षा पल्लवित करण्यात असमर्थ ठरून तिची जागा हुकूमशाही व्यवस्था व्यापते की काय अशा साधार शंका बळावत आहे.●●

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### नेतृत्वाची खरी कसोटी : संपादकीयातून प्रेरणा

शनिवार, १६ मे २०२६ - बहुजन सौरभ आज शनिवार, उगवला नव्या विचारासह, 'बहुजन सौरभ' आला, संपादकीयाची मशाल घेऊन, शिर्षक होते - नेतृत्वाची खरी कसोटी,वाचता वाचता मनात पेटली क्रांतीची वात! मधली दोन पाने, विचारांचे आगार,संपादकीयातून वाहते बोधाचे झरे,लोकशाहीचा इतिहास, निवडणुका, सत्तांतर, त्याग, समर्पण, संघर्षाची सांगते कहाणी सारे! सर्वोच्च नेत्यांनी जो आदर्श दिला, तो कसा जपायचा? प्रश्न हा मोठा,फक्त भाषणाने जनता जागी होत नाही, कृतीतून, आचरणातून बदलाव आणावा लागतो! टिका करून नाही, काम करून दाखवावे, जनतेला न्याय द्यावा, हेच नेतृत्वाचे ब्रीद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर - लोकशाहीचा कणा, समानता, बंधुता, सामाजिक न्यायाचा दिला मंत्र! त्यांचा संघर्ष होता विषमतेविरुद्ध, जातीविरुद्ध,स्पृश्यतेच्या अंधाराविरुद्ध लढले आयुष्यभर, त्यांचे नेतृत्व नव्हते फक्त राजकीय, तर सामाजिक परिवर्तनाचे होते ते व्यापक आंदोलन! साठच्या दशकातील दाखले देत, संपादकीय सांगते, घोषणांनी विश्वास जिंकता येत नाही,कृतीशिवाय राजकारण पोकळ असते,जनतेच्या वेदनांवर फुंकर घालावी लागते! वाचता वाचता जिद्द येते मनात, काहीतरी वेगळे करण्याची, लढण्याची,शांततेसाठी उपाय, आदर्शाने जगणे, दुसऱ्याची मदत, संयमी नेतृत्वाची शिकवण! आज बेरोजगारी, महागाईचा आगडोंब,शेतकरी संकटात, शिक्षण-आरोग्य रसातळाला,कुटुंबांची गणिते कोलमडली, कोण जबाबदार? हा प्रश्न संपादकीय विचारतो रोखठोक! यावर उपाय एकच - संत-बोधिसत्वाचा आदर्श, त्यागातून, सेवेतून, समतेतून देश घडवू, भारतीय अर्थव्यवस्थेलाही हातभार लावू, 'बहुजन सौरभ' हाच देतो आम्हाला मंत्र! संपादकीय मंडळा, तुमच्या तळमळीला सलाम, तुमच्या लेखणीतून झरतो करुणेचा संगम, 'नेतृत्वाची खरी कसोटी' शिकवलीत आज, तुमच्या कार्याला माझा कोटी कोटी प्रणाम! ●●

- सुकुशल य. ना. पाटील

# भटमुक्त भारत झालाच पाहिजे!

**हिंदू ही एक शीवी आहे हिंदू मुळातच पारशी शब्द आहे. आणि त्याचा अर्थ पारशी शब्दांचे डिक्शनरीमधे नमूद केले आहे त्याप्रमाणे ‘हिंदू’ म्हणजे नीच, शुद्र, हरामखोर या अर्थाने वापरला जातो, भारतात पर्शीयनांचे आगमनानंतर बऱ्याच काळाने हा शब्द येथिल लोकांना मुर्ख, मुर्दाड, निच, हलकट यासाठी हिंदू ही एकमेव शीवी वापरली, त्याचे मुख्य कारणही तसेच होते.**

जगाचे पाठीवर केवळ भारतातच अठरापगड जाती आणि तेहतीस कोटी तथाकथित देवी देवतांचे दैवतीकरण असून येथिल मुर्ख जनता दगडाला अन्नपाणी, नैवेद्य हारतुरे घालण्यात खुश होती आजही आहे यावरून ही खात्री पटते व हा येथिल हिंदूंच्या मुर्खपणा चा कळसच आहे, त्यातही नवस उपास तापास, मंत्र तंत्र, ठोके ठुमके, त्यावरुन आपापसात भांडणे व सरळ खुणा खाणी पर्यंत हिंदू नाडले जायचे व अजुनही हे कमी तर झाले नाहीच उलट त्यात दिवसेंदिवस अधिकाधिक भर पडत आहे,. बरं हे प्रबोधन सातत्याने चालू आहे पण हिंदू धार्जिण्यांचे मेंदू पार लकवाग्रस्त आहेत ते काहीही ऐकायला तयार नाहितच,जे कधी घडलेच नाही ते रामायण महाभारत सत्य समजून केवढे मोठे दंगेधोपे आपण पाहिलेत आणि आजही बघतोच आहोत, जयश्रीराम जयनारायण आणि हनुमान सारख्या कपोलकल्पित शब्दावरून केवढे जातीय दंगली घडवून आणल्या जातात आणि आजही हा हिंदु नावाचा मुर्ख समूह त्याला बळी पडतो आहे. कितीही शिकले सवरले पण त्यांच्या अंगातील देवदेवतांचे भुत काही कमीच होत नाही विस डिग्र्या घेऊनही यज्ञयाग करणारा आय ए एस,आय सी एस, खोट्या पुजा अर्चा करून देवीच्या दर्शनासाठी जात असताना अपघात होऊन मरण पावला तरीही या निच हलकट तुच्छ हिंदूचे डोळे उघडत नाही....

‘हे मी कोणत्याही ईर्षपोटी, द्वेशापायी नमुद करत नाही’

तर तुम्ही या साऱ्या भोपटपसार्यातून बाहेर पडावे, आपला आणि आपल्या परिवारासह आपल्या सर्व नातेवाईका समवेत विकास करावा त्यासोबतच संपूर्ण भारतभर हे प्रबोधन समजून सांगायला हवे त्यामुळे तुमचा आणि देशाचा विकास होईल... केवळ तुम्ही शूद्र हिंदूंच्या या ढोंगी बुजगावण्यामूळे सार्या देशाला कलंकित करण्याचा भटांचा डाव खतपाणी घालून




पोसत असल्यामुळे या देशाचे वाटोळे झाले आहे, भटाची हरामजादी जमात हे चांगले ओळखुन आहे, हि हिंदुंची मंदीरे नाहीतच, मी म्हणतो म्हणून नाही तर स्वतः डोळे उघडून बघा, पोथी पुराणांची वैचारिक माहितीपर चिरफाड करा, स्वतः, व प्रश्न करा स्वतःला नाही तर इतर ज्ञानियांसी संवाद करा,उघडा डोळे,अरे ही सर्व मंदिरे नसून ती चौर्यांशीहजार, बौद्ध विहार आहेत, भटांच्या सारे लाटले आणि तुम्हाला, मुर्ख बनवून तुमच्या भरवशावर ते सारे ढोंगी भट ऐतखाऊ, भाडे आयत्या बिळात नागा सारखे मस्त मौज करताहेत. ते या देशाचे कोणीच नाही, त्यांना तुमच्या विकासासी काही देणेघेणे नाही,आजची स्थिती तुमच्या समोर आहेच... तुमच्या मलीद्यावर माजले आहेत, या भटांना एका क्षणात तुम्ही तथाकथित हिंदुत्ववादी, हिंदू त्यांना ताळ्यावर आणु शकता..

तुम्ही ओळखा स्वतःला, झुगारून ध्या हिंदू आणि हिंदूत्व, मंदिर देवळे,आराई, मारावी मेसकाई उपास, तापास नवस सारे सोडून या कपटी नीच हलकट,दळभद्री कळलाव्या भटांना त्यांची जागा दाखवून देण्याची हीच वेळ आहे.विस्तार वाढतोय, म्हणून थोडक्यात पेरीयार रामस्वामी नायकर यांचे शब्दप्रयोगाप्रमाण अनsssुसार ‘रस्त्यावर जर तुम्हाला साप आणि भट बामन दिसला तर भटाला प्रथम ठेचा... म्हणजे भट हा सापाहूनही विषारी आहे, साप ज्याला दंश करेल तो एकटाच मरेल किंवा त्याला वाचविता येणे शक्य आहे,पण भटांचा दंश हा तुमच्या संपूर्ण पिढीला ध्वस्त करील, आज इतिहास तुमच्या समोर आहेच..

ललेन्द्र आम्बुलकर.
मो.९६८९६५४०७५

‘रामायण महाभारत हे थोतांड आहे, कपोलकल्पित काव्य आहे केवळ पेरियार रामस्वामी नायकर यांनी या दोन्ही पुस्तकावर केलेले संशोधनात्मक टिका,समिक्षा सत्य आहे असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे केस क्रमांक २९१. सन१९७१ असून निकाल पेरियार रामस्वामी यांचे बाजूने दिलेला आहे. त्यांचे निधनानंतर सन १९७६ ला सर्वोच्च न्यायालयाने रामायण महाभारत हे खोटे कपोलकल्पित काव्य आहे, असे असताना तुम्ही हिंदू शुद्रांनी त्वरित भानावर यावे यातच आपले सर्वांचे व भारतीयाचे हित आहे, चला तर संकल्प करूया भटमुक्त भारत करण्याचा भटमुक्त भारत झालाच पाहिजे.●●

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बुजदिल है !

## लोकशाही शेतकरी आणि सामाजिक न्याय आजच्या राजकारणाचे वास्तव

भारतीय लोकशाहीची ताकद ही तिच्या विविधतेत, संविधानिक मूल्यांत आणि जनतेच्या जागरूकतेत दडलेली आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर अनेक राजकीय पक्ष सत्तेवर आले, अनेक नेते उदयास आले आणि काळाच्या ओघात राजकीय परिस्थिती बदलत गेली. मात्र लोकशाहीमध्ये कोणतेही सरकार किंवा नेता हा जनतेपेक्षा मोठा नसतो. जनतेच्या प्रश्नांना उत्तर देणे, शासनाच्या धोरणांचे मूल्यमापन करणे आणि आवश्यक तेव्हा टीका करणे हा लोकशाहीचा मूलभूत भाग आहे. भारतातील शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. देशातील कोट्यवधी नागरिकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न हे केवळ कृषी क्षेत्राचे प्रश्न नसून ते राष्ट्रीय विकासाशी संबंधित आहेत. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांना वाढत्या उत्पादन खर्चाचा, अनियमित हवामानाचा, बाजारभावातील चढ-उतारांचा आणि कर्जबाजारीपणाचा सामना करावा लागला आहे. अनेक भागांत शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक राहिले आहे. त्यामुळे कोणतेही सरकार सत्तेवर असो, शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न हे केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. शेतकरी आंदोलनाच्या काळात देशाने अभूतपूर्व परिस्थिती अनुभवली. केंद्र सरकारने आणलेल्या कृषी कायद्यांविरोधात लाखो शेतकरी रस्त्यावर उतरले. सरकारचे म्हणणे होते की या कायद्यांमुळे शेती क्षेत्रात सुधारणा होतील, तर आंदोलक शेतकऱ्यांना भीती होती की त्यामुळे त्यांच्या हक्कांवर आणि उत्पन्नावर परिणाम होईल. अखेर दीर्घ आंदोलनानंतर सरकारला हे कायदे मागे घ्यावे लागले. या घटनेने लोकशाहीतील जनमताचे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले. आजही शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ झालेली नाही, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. खतांचे दर, बियाण्यांचा खर्च, सिंचनाच्या समस्या आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कायम आहे. अशा परिस्थितीत सरकारने केवळ आश्वासने न देता दीर्घकालीन आणि परिणामकारक धोरणे राबविण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राजकीय भाषणे करण्यापेक्षा प्रत्यक्ष उपाययोजना अधिक महत्त्वाच्या आहेत. याचबरोबर देशात बेरोजगारी, महागाई आणि आर्थिक असमानता हेही गंभीर विषय आहेत. शिक्षण पूर्ण करून लाखो तरुण रोजगाराच्या शोधात आहेत. सरकारी नोकऱ्यांच्या संधी मर्यादित होत असताना खासगी क्षेत्रातही स्थिर रोजगार मिळणे कठीण होत आहे. महागाईमुळे सामान्य




नागरिकांचे जीवनमान प्रभावित झाले आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडत आहे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांची भूमिका तितकीच महत्त्वाची असते. सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, पर्यायी धोरणे मांडणे आणि जनतेच्या समस्यांकडे लक्ष वेधणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे. परंतु त्याच वेळी विधायक टीका आणि तथ्यांवर आधारित चर्चा होणे आवश्यक आहे. वैयक्तिक टीका, द्वेषपूर्ण भाषा किंवा समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये लोकशाहीला कमकुवत करतात. सामाजिक न्यायाचा प्रश्नही आज अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय संविधानाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि इतर वंचित घटकांना समान संधी मिळावी



हरिदास भिसे
मो. 9923742372

यासाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. आरक्षण हे केवळ नोकरी किंवा शिक्षणातील जागांचे वाटप नसून सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपण दूर करण्याचे साधन आहे. त्यामुळे आरक्षणासंबंधी कोणतेही निर्णय घेताना व्यापक सामाजिक परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे. आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या चर्चेत आहे. काही समाजघटकांना वाटते की आरक्षणाचा लाभ सर्व उपघटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नाही, त्यामुळे उपवर्गीकरण गरजेचे आहे. तर दुसऱ्या बाजूला काही जणांना भीती आहे की अशा प्रक्रियेमुळे समाजात नवीन तणाव निर्माण होऊ शकतो. या विषयावर भावनिक प्रतिक्रिया देण्याऐवजी संविधान, न्यायालयीन निर्णय आणि सामाजिक वास्तव यांच्या आधारे चर्चा होणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि इतर समाजसुधारकांनी समता, बंधुता आणि न्याय यांची मूल्ये समाजासमोर ठेवली. या मूल्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. सामाजिक न्यायाचा संघर्ष हा कोणत्याही एका समाजापुरता मर्यादित नसून संपूर्ण राष्ट्राच्या प्रगतीशी जोडलेला आहे. आर्थिक क्षेत्रातही पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आवश्यक आहे. मोठ्या उद्योगसमूहांबाबत, गुंतवणुकीबाबत किंवा सरकारी धोरणांबाबत प्रश्न उपस्थित करणे हे लोकशाहीचे लक्षण आहे. परंतु कोणतेही आरोप किंवा निष्कर्ष काढताना विश्वसनीय पुरावे आणि तथ्यांचा आधार असणे गरजेचे आहे. अफवा, अपूर्ण माहिती किंवा राजकीय प्रचार यांवर आधारित मतप्रवाह समाजात गोंधळ निर्माण करू शकतात. भारतीय लोकशाहीची खरी ताकद ही संविधानावर असलेल्या विश्वासात आहे. सरकारे बदलतात, पक्ष बदलतात, नेते बदलतात; परंतु संविधानातील मूल्ये कायम राहतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि कायद्याचे राज्य ही तत्त्वे देशाला एकत्र बांधून ठेवतात. त्यामुळे कोणत्याही राजकीय मतभेदांपेक्षा संविधानिक मूल्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. आजच्या काळात नागरिकांनी केवळ समर्थक किंवा विरोधक म्हणून नव्हे, तर जागरूक नागरिक म्हणून विचार करण्याची गरज आहे. सरकारच्या चांगल्या कामांचे स्वागत करणे आणि त्रुटींवर प्रश्न विचारणे ही दोन्ही लोकशाहीतील आवश्यक कर्तव्ये आहेत. व्यक्तीपूजा किंवा अंधविरोध यापैकी कोणतीही भूमिका देशहिताची नाही. लोकशाही टिकवायची असेल तर संवाद, तथ्याधारित चर्चा आणि संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा आवश्यक आहे. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, तरुण आणि वंचित घटक यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून विकासाचा मार्ग निवडला तरच भारत खऱ्या अर्थाने प्रगत आणि समताधिष्ठित राष्ट्र बनू शकेल. जनतेच्या आशा-आकांक्षांचा आदर करणारी, सामाजिक न्यायाला बांधील असलेली आणि संविधानाच्या चौकटीत काम करणारी लोकशाही हीच भारताची खरी ओळख राहील.●●

## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प 165

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा खेर्डा ( बुद्रुक ) ता. कारंजा लाड, जि. वाशीम



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मुख्य चौकात असून येथिल लोक येथे एकत्र येतात. दिनविशेष कार्यक्रम आयोजित करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार येथिल लोक शिक्षण घेऊन संघटित आहेत. कारंजा हे चळवळीचे ठिकाण आहे.

संवाद मित्र, राजू थुल
9423420031

# प्रत्येक बुद्ध विहारात अनिवासी बाल संस्कार शिबिरे आयोजित व्हावीत : पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम

**चिंचोली (फेटरी) :** बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक बुद्ध विहारात निवासी शिबिरांसोबतच अनिवासी बाल संस्कार व व्यक्तिमत्त्व विकास शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी व्यक्त केली. बुद्ध विहार संचालक मंडळे, बुद्ध विहार समन्वय समित्या आणि विविध प्रबोधनकारी संस्थांनी एकत्रितपणे हे कार्य हाती घेतल्यास पुढील पिढ्यांच्या जडणघडणीस मोठी मदत होईल, असे ते म्हणाले शांती वन, चिंचोली येथे संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रम, जरूड (ता. वरूड, जि. अमरावती), बुद्ध विहार समन्वय समिती आणि शांती वन यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ते ३१ मे २०२६ या कालावधीत आयोजित बाल संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकास शिबिराच्या समारोप कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अशोक सरस्वती बौद्ध यांच्या मार्गदर्शनाखाली २००१ पासून हे उन्हाळी शिबिर सातत्याने आयोजित करण्यात येत आहे. आपल्या मार्गदर्शनात डॉ. मेश्राम यांनी सांगितले की, "मी स्वतः बाबा आमटे यांच्या श्रमसंस्कार शिबिरातून घडलो. अशा शिबिरांमधून मुलांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव विकसित होते." त्यांनी शिबिरार्थी मुलांशी संवाद साधत त्यांना लहानपणापासूनच जीवनाचे ध्येय निश्चित करण्याचा सल्ला दिला. यावेळी अतिथी डॉ. एन. डी. पाटील यांनी २००१ पासून या उपक्रमाचे साक्षीदार असल्याचे सांगून अशा शिबिरांची परंपरा अखंड सुरू राहण्याची अपेक्षा व्यक्त केली. डॉ. सुहास कानफाडे यांनी समूहात राहण्यामुळे मुलांमध्ये स्वावलंबन आणि आत्मविश्वास वाढतो, हेच भविष्यातील यशाचे पहिले पाऊल असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आश्रमाचे संस्थापक उपाध्यक्ष सत्यशोधक भारुडकार हरीकिशन हटवार होते. आश्रम व समितीचे अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध यांनी शिबिरातील विविध उपक्रमांची माहिती देत शिक्षकांचा परिचय करून दिला.



शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या छिंदवाडा येथील सर्वजित चौकीवर, नागपूर येथील अर्णव खरे, तसेच सौम्या मेश्राम आणि स्वरा मेश्राम यांचा उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून गौरव करण्यात आला. विविध स्पर्धांतील विजेत्यांना प्रमाणपत्रे आणि पुस्तकांचे बक्षीस देण्यात आले.

या शिबिरात बुलढाणा, अमरावती, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, रायगड आणि पालघर जिल्ह्यांतील एकूण ११६ मुलांनी सहभाग घेतला. त्यामध्ये ४७ मुली आणि ६९ मुलांचा समावेश होता. शिबिरात अशोक सरस्वती बौद्ध, डॉ. प्रमिला चिंचखेडे, सतीश गायकवाड, बबिता गायकवाड, सुविता लोखंडे, सोनू नागदेवे, अश्विनी मोडक, सुचिता बुरबुरे, प्रा. घनश्याम धाबर्डे, स्मिता खैरनार आणि विद्याराज कोरे यांनी शिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. तसेच १८ स्वयंसेवकांनी आयोजनात सक्रिय सहभाग नोंदविला.

शिबिरादरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रबोधनकार विद्याराज कोरे यांनी संत गाडगेबाबांच्या वेशभूषेत कीर्तन सादर केले, तर पवन वाघमारे यांनी गीत गायनाद्वारे उपस्थितांची मने जिंकली.

याच कालावधीत पाली भाषा प्रशिक्षण शिबिराचेही आयोजन करण्यात आले. आचार्य अश्विनी मोडक यांनी प्रशिक्षण दिले. कामठी, परतवाडा, नागपूर, अमरावती आणि वाशीम जिल्ह्यांतील ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.

शिबिराचे मुख्य आयोजक अशोक सरस्वती बौद्ध आणि डॉ. प्रमिला चिंचखेडे होते, तर सतीश गायकवाड आणि बबिता गायकवाड यांनी शिबिर नेतृत्वाची जबाबदारी पार पाडली. विशेष बाब म्हणजे, शिबिरासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात आले नाही. समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आणि १६० दात्यांच्या आर्थिक योगदानातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्णव खरे, तक्ष लोखंडे, मिहिर घोरपडे, स्वरा मेश्राम, त्रिशा वाघमारे, आशय सोमकुवर, अयन मोडक आणि अभिर ठमके यांनी केले. प्रास्ताविक सतीश गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन बबिता गायकवाड यांनी केले.

## महत्वाचे

### डीपीसी सदस्यपदी नियुक्तीबद्दल राजाभाऊ टाकसाळे यांचा सत्कार



**नागपूर :** सेंट पॉल स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे संचालक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे यांची नागपूर जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) सदस्यपदी शासनाने मनोनयन केल्याबद्दल रिपब्लिकन मूव्हमेंटतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. रविभवन येथे झालेल्या कार्यक्रमात नरेश वाहाने, भंते नागदीपंकर, भीमराव वैद्य यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.यावेळी बोलताना टाकसाळे यांनी पक्षाने दाखविलेल्या विश्वासास पात्र ठरण्याची ग्वाही देत ग्रामीण भागातील विकासकामांसाठी डीपीसीमार्फत अधिकाधिक निधी मिळविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच दलित बस्ती सुधार योजनेसाठीही जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला प्रेमकुमार उके, एन.टी. मेश्राम, मनोज शेंडे, केवल जीवनतारे, रवि गजभिये, आनंद डेकाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### इमामवाडा बुद्ध विहारात ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त प्रबोधन

**नागपूर :** प्रबुद्ध समाज समिती शाखा विठ्ठलवाडीच्या वतीने ₹कहीं हम भूल न जाएं₹ या उपक्रमांतर्गत इमामवाडा बुद्ध विहार येथे ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला बौद्ध उपासक-उपासिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबुद्ध समाज समितीचे अध्यक्ष पी.आर. धोंगडे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी माता रमाई, माईसाहेब डॉ. सविता आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त तसेच महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बुद्धधम्म जोपासण्याची आणि त्याचा प्रसार करण्याची जबाबदारी समाजाने समर्थपणे पार पाडली पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते गुलचंद रंगारी यांनी महापुरुषांच्या संघर्षमय जीवनाची आठवण करून देत समाजातील मतभेद बाजूला ठेवून समान ध्येयासाठी एकजूट होण्याचे आवाहन केले. धम्मप्रचारक सुनील लोखंडे यांनी ज्येष्ठ पौर्णिमेचे महत्त्व विशद केले. के.एल. लिंगायत यांनी पंचशीलाचे महत्त्व स्पष्ट करतांना, कमीत कमी एक शील जरी आचरणात आणले तरी व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असे मत व्यक्त केले. धनराज बहादुरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ' मुझे पढ़े-लिखे लोगों ने धोखा दिया' या विधानाची आठवण करून दिली. संचालन वासुदेवराव डोंगरे यांनी केले. विजय बाबू चिंचखेडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला शामकांत जाधव यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजेश नगराळे यांनी विशेष परिश्रम घेतले. धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले.

### कबीरनगर येथील धम्मदूत बुद्ध विहारात श्रमणेर मुलांना धम्म मार्गदर्शन



**नागपूर :** धम्मदूत विकास समितीच्या संचालक मंडळाच्या वतीने, भाविक व उपासक-उपासिकांच्या सहकार्याने कबीरनगर येथील धम्मदूत बुद्ध विहारात धार्मिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात श्रमणेर मुलांना धम्म शिक्षण व मार्गदर्शन देण्यात आले. भदंत धम्मबंधू, भदंत शीलवंश, भदंत संघरत्न आणि आर्या भिक्षुणी सुमेधा यांच्या मार्गदर्शनाखाली भीम चौक येथील शाक्यमुनी बुद्ध विहारात दहा दिवसीय बाल धम्म शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी झालेल्या आणि नुकतेच श्रमणेर दीक्षा घेतलेल्या सुमारे ३० मुलांचा समूह चारिकेसाठी कबीरनगर येथील धम्मदूत बुद्ध विहारात दाखल झाला. कार्यक्रमात भदंत शीलवंश यांनी उपस्थित उपासक-उपासिकांना धम्माविषयी मार्गदर्शन केले. आपल्या प्रवचनात त्यांनी बुद्धांचा धम्म हा नीतिमत्ता, सद्गुण, ज्ञान, शांती, मैत्री आणि करुणेचा मार्ग असल्याचे सांगितले. बुद्धधम्म हा वैज्ञानिक आणि तर्कसंगत विचारसरणीवर आधारित असून मानवतेच्या कल्याणासाठी मार्गदर्शक ठरतो, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला 'द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया'चे विश्वस्त व महासचिव अमर दिपांकर यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच धम्मदूत बुद्ध विहार समितीचे सचिव शैलेंद्र त्रिपुडे, रसिका चौहान, उषा सहारे, मंदा दरवाडे, प्रमिला रामटेके, नलिनी गजघाटे, कमल मेश्राम, लोखंडे, इंदू ढोके, किरण पाटील, फुले यांच्यासह अनेक उपासक-उपासिका व महिला कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष योगदान दिले.

## कोसमी येथील त्रिरत्न बौद्ध विहारात ज्येष्ठ पौर्णिमा महोत्सव साजरा

**बालाघाट (मध्य प्रदेश) :** बौद्धनगर, कोसमी येथील त्रिरत्न बौद्ध विहार व ध्यान साधना सद्धम्म प्रशिक्षण केंद्रात बहुजन संघ, संरक्षक संघ आणि धम्मराज धम्ममार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ पौर्णिमा महोत्सव धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपासक-उपासिकांची उपस्थिती लाभली. यावेळी पूज्य भदंत भिक्खू धम्मशिखर यांनी उपस्थितांना ध्यान साधनेचे मार्गदर्शन केले. तसेच परित्राण सूत्रांचे पठण करून उपासक-उपासिकांना उपोसथ शील प्रदान केले. कार्यक्रमादरम्यान विद्वान उपासक-उपासिकांनी ज्येष्ठ पौर्णिमेचे धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व विशद केले. विविध वक्त्यांनी भगवान बुद्धांच्या धम्मातील मूल्ये आणि त्यांचे



आजच्या काळातील महत्त्व यावरही प्रकाश टाकला. यावेळी पूज्य भदंत धम्मशिखर यांनी 'सैद्धांतिक आणि व्यवहारिक धम्म' या विषयावर सखोल व प्रेरणादायी धम्मप्रवचन केले. त्यांनी धम्माचे तत्त्वज्ञान आणि दैनंदिन जीवनातील आचरण यांचा परस्पर संबंध स्पष्ट करत उपस्थितांना धम्ममार्गावर दृढ राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या मार्गदर्शनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनुमोदन व्यक्त केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी उपासक-उपासिकांनी पूज्य भदंत धम्मशिखर यांना अष्टपरिस्कार दान अर्पण केले. त्यानंतर सामूहिक भोजनाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा, धम्मचिंतन आणि सामूहिक सहभागाच्या वातावरणात ज्येष्ठ पौर्णिमा महोत्सवाची सांगता झाली.

## प्रज्ञा ज्योत बुद्ध विहारात ज्येष्ठ पौर्णिमा उत्साहात साजरी

**नागपूर :** जरीपटका येथील भीम चौक परिसरातील प्रज्ञा ज्योत बुद्ध विहारात ज्येष्ठ पौर्णिमा निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपासक-उपासिकांनी सामूहिकरीत्या त्रिशरण, पंचशील, बुद्ध वंदना, धम्म वंदना व संघ वंदना करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर विहाराचे अध्यक्ष निलकंठ बहादुरे, प्रमुख वक्ते श्रीराम बनसोड आणि अतिथी भगवान निमगडे यांच्या हस्ते भगवान बुद्ध तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित उपासक-उपासिकांनीही पुष्पवंदना केली. कार्यक्रमात अध्यक्ष निलकंठ बहादुरे यांचे स्वागत आशा बोरकर व इंदिरा बोरकर यांनी, प्रमुख वक्ते श्रीराम बनसोड यांचे स्वागत माला मंडपे यांनी, तर अतिथी भगवान निमगडे यांचे स्वागत आशा वासे यांनी केले. मार्गदर्शन करताना भगवान निमगडे यांनी ज्येष्ठ पौर्णिमेचे महत्त्व आणि तथागत बुद्धांच्या जीवनातील या दिवसाशी संबंधित घटनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन व प्रमुख वक्त्यांचा परिचय विहाराचे सचिव मिलिंद मेश्राम यांनी करून दिला. यावेळी 'अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण योग्य आहे काय?' या विषयावर श्रीराम बनसोड यांनी अभ्यासपूर्ण धम्मप्रवचन केले. त्यांनी जातीव्यवस्था, आरक्षण व्यवस्था आणि विषमतावादी राज्य व्यवस्थेमुळे अनुसूचित जातींच्या हक्कांचे होणारे हनन व त्यांच्या



जीवनातील अडचणी यांवर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच समाजाने सजग राहून कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबतही त्यांनी सैद्धांतिक विचार मांडले. पुढील पिढीला सकारात्मक दिशा देण्यासाठी वर्तमान पिढीने संघर्ष आणि कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात निलकंठ बहादुरे यांनी समतामूलक समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनकर्ती व्यवस्था हस्तगत करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मदीक्षेवेळी दिलेल्या २२ प्रतिज्ञा मानवी कल्याणाचा मार्ग दर्शवितात आणि त्या आचरणात आणल्यास जीवनाचे खरे सार्थक होईल, असे मत व्यक्त केले. राजन सोनटक्के यांनी आभार प्रदर्शन केले. धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त आयोजित डब्बा शिबिराचा उपस्थितांनी आनंद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विहाराचे पदाधिकारी, सदस्य, उपासक व उपासिकांनी विशेष परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या खैरी शाखेची स्थापना

**खैरी (नागपूर) :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विदर्भातील ४६ वी शाखा खैरी (नागपूर) येथे नुकतीच स्थापन करण्यात आली. जिल्हा पदाधिकारी मंगला गाणार यांच्या पुढाकारातून झालेल्या या कार्यक्रमाला राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, राज्य सांस्कृतिक कार्यवाह देवानंद बडगे, तसेच जिल्हा प्रधान सचिव गौतम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शाखा स्थापनेच्या बैठकीत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पराग जंगम यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली, तर स्नेहदीप मानकर यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष म्हणून अश्विन बागडे, प्रधान सचिव म्हणून कपिल मानकर, बुवाबाजी संघर्ष कार्यवाह म्हणून अशोक महेशगवली, वैज्ञानिक जाणीवा



प्रकल्प कार्यवाह म्हणून पांडुरंग मानकर, वार्तापत्र प्रकाशन कार्यवाह म्हणून ध्वजपाल फुले, महिला सहभाग कार्यवाह म्हणून सुजाता डोंगरे, मानसिक आरोग्य कार्यवाह म्हणून संजूभाऊ मानकर, विविध उपक्रम कार्यवाह म्हणून विजय मानकर, जातीअंत विभाग प्रमुख म्हणून नीता रामटेके, प्रशिक्षण विभाग प्रमुख म्हणून अशोक कानफाडे, सोशल मीडिया कार्यवाह म्हणून सुषमा जंगम, सांस्कृतिक कार्यवाह म्हणून संजूभाऊ मानकर आणि कायदा विभाग प्रमुख म्हणून ॲड. स्मिता फुले यांची निवड करण्यात आली. सभेचे प्रास्ताविक ज्येष्ठ कार्यकर्ते चित्तरंजन चौरे यांनी केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि समाजप्रबोधनातील भूमिका याविषयी राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सभेची कार्यवाही चित्तरंजन चौरे यांनी पार पाडली. यावेळी नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा नागपूर जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वार्तापत्र, पुस्तके आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी देवानंद बडगे यांनी चळवळीचे गीत सादर केले. शोभा पाटील आणि मंगला गाणार यांनी नव-निर्वाचित कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन स्नेहदीप मानकर यांनी केले. या कार्यक्रमाला गावातील अनेक ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



## बसपातर्फे अहिल्याबाई जयंती साजरी

**नागपूर :** मध्यप्रदेश च्या माळवातील राजमाता व महाराणी अहिल्याबाई खंडेराव होळकर यांची 301 वी जयंती बसपाने नागपुरात साजरी केली. कही हम भूल ना जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत अजनी रेल्वे स्टेशन समोरील अहिल्याबाईंच्या नियोजित स्मारक परिसरात बसपा नेते उत्तम शेवडे, चंद्रशेखर कांबळे, सदानंद जामगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जयंती समारोह साजरा झाला. इंदोर परिसरात मल्हारराव होळकर परिवाराचे राज्य होते, त्यांचे सुपुत्र खंडेराव हे लढाईत मारले गेल्यावर त्यांची पत्नी अहिल्याबाई यांनी तो राज्यकारभार सांभाळला व सतत 30 वर्षे राज्य केले अशा या शौर्यशाली राजमातेपासून बहुजन समाजाने प्रेरणा घ्यावी असे आवाहन बसपा नेते उत्तम शेवडे यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन वंजारी यांनी, संचालन दक्षिण पश्चिम नागपूरचे प्रभारी पंकज नाखले यांनी तर समारोप सुरेंद्र डोंगरे यांनी केला. कार्यक्रमाला प्रामुख्याने बीव्हीएफचे संगीतबाबू इंगळे, मध्य नागपूरचे प्रभारी अभय डोंगरे, विषूल ताकसांडे, प्रा जगदीश गेडाम, संभाजी लोखंडे, शामराव तिरपुडे, तथागत कांबळे आदि प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

## आयटीआय निदेशकांच्या मेळाव्यात व्यसनमुक्तीचा संकल्प



**नागपूर :** जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त आयोजित तंबाखूमुक्त जनजागर सप्ताहाचा समारोप महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेच्या वार्षिक मेळाव्यात उत्साहात पार पडला. सामाजिक न्याय विभाग, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, व्यसनमुक्त समन्वय मंच, उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था आणि नशाबंदी जिल्हा कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित सुमारे अडीचशेहून अधिक आयटीआय निदेशकांनी व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करून तंबाखूमुक्त समाज निर्मितीसाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा केली. कार्यक्रमात नागपूर जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी सुखदेव कौरती यांच्या मार्गदर्शनाखाली नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी व्यसनमुक्ती अभियानाची माहिती दिली. त्यांनी व्यसनमुक्तीपर पोस्टर प्रदर्शनी, पुस्तके व जनजागृतीपर पत्रकांचे वितरण तसेच व्याख्यानांच्या माध्यमातून नागपूर जिल्ह्यातील मौदा, कामठी, सावनेर, पारशिवनी, हिंगणा आणि रामटेक तालुक्यांतील गावागावांत तंबाखूमुक्त जीवनाबाबत व्यापक जनजागृती करण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे अध्यक्ष भोजराज काळे, पदवीधर आमदार अभिजीत वंजारी, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, सहसंचालक पुरुषोत्तम देवतळे, महादेव माळी, श्वेता कुलकर्णी, प्रमोद ठाकरे, विनोद पुरोहित, विनोद पाटील, शिवाजी ठुमणे, प्रमोद भैसारे, साहेबराव गुडदे, युवराज खोब्रागडे, सचिन माळीकर, जितेंद्र टोंगे, विपिन मेश्राम, मुकेश मेश्राम, धीरज सव्वालाखे, अनिल रंगारी, माधुरी बालपांडे, विभागीय अध्यक्ष जयंत टालाटुले, सुधाकर भेंडे, संजय मेहेरे, चंद्रशेखर गरमडे आणि विलास भगत यांची प्रमुख उपस्थिती होती. तंबाखूमुक्त जनजागर अभियान यशस्वी करण्यासाठी नशाबंदी जिल्हा कृती समितीचे तालुका अध्यक्ष ताराचंद पखिडे, विलास शेवाळे, चंद्रशेखर महाजन, नलिनी शिरकुरे, मुकुंद वझरवार आणि जयसिंग रच्छोरे यांनी विशेष सहकार्य केले.

## धनश्री भुसे यांचा संघर्षातून यशाकडे प्रेरणादायी प्रवास

**नागपूर :** नागपूरच्या धनश्री चंद्रशेखर भुसे यांनी युनायटेड किंगडममधील ऑक्सफर्ड ब्रुक्स विद्यापीठातून एमएससी फायनान्स पदवी प्राप्त करून आपल्या कुटुंबातील परदेशात उच्च शिक्षण घेणारी पहिली व्यक्ती होण्याचा मान मिळविला आहे. अपयश, आर्थिक अडचणी आणि अनेक आव्हानांवर मात करत त्यांनी मिळविलेल्या या यशाची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. साध्या निम्न-मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या धनश्री यांना शिक्षणासाठी आई-वडिलांनी मोठे प्रोत्साहन दिले. त्यांच्या वडिलांनी कुटुंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळत मुलींच्या शिक्षणासाठी अनेक त्याग केले, तर आईने भावनिक आधार देत मुलीच्या स्वप्नांना बळ दिले. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणात धनश्री यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. दहावीत ८८ टक्के गुण मिळविल्यानंतर बारावी वाणिज्य शाखेत त्यांनी महाविद्यालयात तिसरा क्रमांक पटकावला. त्यांना 'मिस स्टुडिओस अवॉर्ड' नेही सन्मानित करण्यात आले होते. मात्र त्यांचा प्रवास सरळ नव्हता. चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए) परीक्षेत तीन वेळा अपयश आल्याने त्यांचा




आत्मविश्वास डळमळीत झाला. त्यानंतर सीएमए यूएसएचा प्रयत्नही यशस्वी ठरला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, नागपूर येथून बी.कॉम. पूर्ण केल्यानंतर त्यांनी हेक्सावेअर टेक्नॉलॉजीजमध्ये काम केले आणि नंतर एचडीएफसी बँकेत सेवा बजावली. बँकिंग क्षेत्रातील अनुभवामुळे त्यांना व्यावसायिक कौशल्ये आणि आर्थिक क्षेत्राची सखोल समज प्राप्त झाली. दरम्यान, ऑक्सफर्ड ब्रुक्स विद्यापीठातून एमएससी फायनान्स करण्याचे त्यांचे स्वप्न कायम होते. आर्थिक मर्यादा, शैक्षणिक कर्जासाठी आलेले नकार आणि विविध अडथळ्यांवर मात करत त्यांनी अखेर प्रवेश मिळविला. १३ सप्टेंबर २०२४ रोजी त्या एकट्याच युनायटेड किंगडमला रवाना झाल्या. परदेशातील वास्तव्यात त्यांनी शिक्षणासोबतच पार्ट-टाईम नोकरी, आर्थिक व्यवस्थापन, घरकाम आणि अभ्यासाचा समतोल साधत अनेक आव्हानांचा सामना केला. आज धनश्री भुसे या ऑक्सफर्ड ब्रुक्स विद्यापीठाच्या पदवीधर असून सध्या लंडन येथील कॅनरा बँकेच्या शाखेत कॉर्पोरेट बँकिंग क्षेत्रात कार्यरत आहेत. आपल्या यशाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, 'सीए आणि सीएमएमधील अपयश हा माझ्या प्रवासाचा शेवट नव्हता, तर नव्या मार्गाची सुरुवात होती. परिस्थिती कितीही कठीण असली तरी प्रयत्न सुरू ठेवले तर यश मिळते. वेगापेक्षा प्रगती महत्त्वाची असते.' त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास आजच्या तरुणांसाठी चिकाटी, आत्मविश्वास आणि सातत्याचा आदर्श ठरत आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648